रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २९१ | पृष्ठे ८ | RGD/016/2026-28 www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६

किंमत ४ ₹


## कामोठ्यात एफडीएची कारवाई

**पनवेल** : कामोठे सेक्टर १० येथील जय भवानी मेडिकल स्टोअरमध्ये फार्मासिस्टशिवाय अकरावी-बारावीतील मुलाकडून औषधवाटप होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने संबंधित मेडिकलचे लायसन्स निलंबित केले आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सदर प्रकार महाराष्ट्र नवनिर्माण सेना कार्यकर्त्यांनी उघडकीस आणला होता. औषधविक्रीसारख्या अत्यंत संवेदनशील क्षेत्रात प्रशिक्षित फार्मासिस्टऐवजी अल्पवयीन मुलाकडून औषधे दिली जात असल्याने रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पान ५ वर

## पुण्यात अवकाळीची एन्ट्री

**पुणे** : पुण्यातील वेगवेगळ्या भागांत सोमवारी दुपारी अवकाळी पावसाने हजेरी लावली. हलक्या पावसाच्या शिडकाव्याने उन्हाची तीव्रता कमी झाली. हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पुण्यासह कोकणातही ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता वर्तवली होती. काही भागांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला होता. पुण्यातील बाणेरमध्ये गारांचा पाऊस तर पाषाणमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली, याशिवाय बालेवाडी, म्हाळुंगेतही पाऊस सुरु होता. हवामान विभागानुसार, ३० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान राज्यात हवामानात मोठा बदल अपेक्षित आहे.

# अटल सेतू थेट अलिबागला जोडणार | कोस्टल कॉरिडॉर उभारणीच्या हालचाली सुरु




**मार्गाच्या पुढील टप्प्यात द्रोणागिरीमार्गे या रस्त्याला रेवस-करंजा पुलाशी जोडण्याचा प्रस्ताव आहे. अटल सेतूच्याही पुढे विस्तारणारा एक थेट किनारी मार्ग तयार होणार आहे.**

**| रायगड | प्रतिनिधी |**

देशातील सर्वात लांब असलेला सागरी सेतू, म्हणजेच अटल सेतूचे अलिबागशी जोडणी करण्याचे काम सुरू आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई आणि अलिबाग यांच्यातील प्रवासाचा कालावधी अवघ्या दीड तासांवर येईल. मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्राच्या कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण कामगिरी मानली जात आहे. देशाच्या आर्थिक राजधानीला विस्तारीकरणासाठी खुणावणाऱ्या अलिबाग तालुक्याच्या किनारपट्टीवरून थेट कोकणच्या दिशेने जाणारा कोस्टल कॉरिडॉर सरकारच्या पटलावर आला आहे.यासाठी रेवस करंजा सागरी पूल महत्वाचा दुवा ठरणार आहे. भविष्याचा विचार करून कोस्टल कॉरिडॉर उभारणी सरकारने फास्ट ट्रॅकवर घेतली आहे.

राज्य सरकारने अटल सेतूला थेट अलिबागशी जोडण्याचा प्रस्ताव मांडला आहे. सिडकोने या प्रकल्पाचे काम सुरू केले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीए आणि कोकण विभाग यांच्याशी अखंड रस्ते संपर्क प्रस्थापित करणे, हे यामागील उद्दिष्ट आहे. उलवे परिसरात सध्या सुमारे ७ किलोमीटर लांबीचा सहा-पदरी किनारी रस्ता उभारला जात आहे. या मार्गाच्या पुढील टप्प्यात, द्रोणागिरीमार्गे या रस्त्याला रेवस-करंजा पुलाशी जोडण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे मअटल सेतूफ्च्याही पुढे विस्तारणारा एक थेट किनारी मार्ग तयार होणार आहे. कांदळवनांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने, या मार्गाच्या काही विशिष्ट भागांमध्ये उन्नत रस्ते उभारण्याची योजना आखण्यात आली आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे १,६०० कोटी रुपये इतका आहे.

या प्रकल्पाचा विस्तार करण्याच्या कामासाठी येणारा खर्च मात्र २,५०० ते ४,००० कोटी रुपयांच्या दरम्यान असण्याची शक्यता आहे. एकदा का रेवस-करंजा पुलाशी जोडणी पूर्ण झाली, की मुंबई आणि नवी मुंबई थेट रस्त्यामार्गे अलिबागशी आणि त्याही पुढे जाऊन संपूर्ण कोकण प्रदेशाशी जोडली जाईल. यामुळे फेरी सेवांवरील अवलंबित्व कमी होईल आणि पर्यटन क्षेत्राला मोठी पान ५ वर

## पनवेल महापालिकेच्या विवरण पत्रात

# कोट्यवधींचा फुगवटा




**थकबाकीवरच अवलंबून विकास; प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा आकड्यांचा खेळ अधिक?**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

आयुक्त मंगेश चितळे यांनी सन २०२६-२७ साठी तब्बल ४,८५३ कोटी ९० लाखांचे विवरण पत्र सादर केले असलेतरी विवरण पत्रातील आकडेवारीवरून विकासापेक्षा आकड्यांचा खेळ अधिक असल्याचा आरोप पालिकेतील विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे यांनी केला आहे.

अखेर केवळ १० लाखांची शिल्लक दाखवत जमा-खर्च जुळवण्याचा प्रयत्न करण्यात आला. उत्पन्नात सर्वाधिक भर थकबाकी वसुलीवर टाकण्यात आली असून सुमारे ३३.६५ टक्केउत्पन्न थकबाकीतून येईल, असा दावा करण्यात आला आहे. प्रत्यक्षात ही वसुली कितपत होणार, याबाबत प्रशासनाकडे ठोस उत्तर नाही. आरंभीची शिल्लक २८ टक्क्यांहून अधिक दाखवून विवरण पत्र फुगवण्यात आले आहे.

### खर्चात मोठे प्रकल्प, पण अंमलबजावणीचा प्रश्न

खर्चाच्या बाजूला रस्ते, पाणी, कचरा व्यवस्थापन यांसाठी कोट्यवधींच्या तरतुदी दाखवल्या असल्यातरी, यापैकी अनेक कामे मागील वर्षांपासून प्रलंबित असल्याची वस्तुस्थिती आहे.

### नव्या इमारतींवर कोट्यवधींची उधळपट्टी?

नवीन प्रशासकीय इमारत (रु. २०० कोटी), होल्डिंग पॉड, समाजमंदिरे आणि बाजार विकास यांसारख्या प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात निधी राखून ठेवण्यात आला आहे. शहरातील मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करून दिखाऊ प्रकल्पांना प्राधान्य दिल्याची टीका होत आहे.

### विशेष योजनांवर प्रश्नचिन्ह

**शिलार धरणासाठी रु. १५० कोटी, अमृत-२ योजना आणि झोपडपट्टी सुधारणा योजनांसाठी निधी राखण्यात आला असला, तरी या योजनांची गती आणि पारदर्शकता यावर आधीपासूनच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**

**रस्ते कामांसाठी रु. 358 कोटी**

**घनकचरा व्यवस्थापनासाठी रु. 318 कोटी**

**आरोग्य सेवांसाठी रु. 194 कोटी**

**बागा व उद्याने विकासासाठी रु. 159 कोटी**

**माहिती व तंत्रज्ञानासाठी रु. 143 कोटी**

**असे मोठे आकडे दाखवण्यात आले आहेत.**

> आयुक्तांनी सादर केलेल्या विवरण पत्रावर विचार विनिमय करण्याकरता आठ ते दहा दिवसांचा वेळ मागण्यात आला आहे त्यानंतर त्यात काही बदल असल्यास ते करून पालिकेच्या सभागृहात विवरण पत्राला मान्यता देण्यात येईल
>
> – बबन मुकादम, सभापती. स्थायी समिती.

> आयुक्तांनी सादर केलेले विवरण पत्र वस्तुस्थितीला धरून नाही. हे सादर केलेले विवरण पत्र फुगीर वाटत आहे.
>
> – अरविंद म्हात्रे, विरोधी पक्ष नेते

याशिवाय, जीएसटी अनुदान, युडीसीपीआर शुल्क आणि विविध अनुदानांवर मोठा भर देण्यात आला आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी सादर केलेले विवरण पत्र कागदावर भव्य दिसत असलेतरी प्रत्यक्षात उत्पन्नाची अनिश्चितता आणि खर्चातील प्राधान्यक्रम पाहता ते कितपत वास्तववादी आहे, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

## महसूल विभागाची चुक; वृद्ध महिलेची फसवणूक



**■ पंचनाम्यामुळे जमिनीचा वर्ग बदलला**

**■ कर्जत- कोटींबे येथील घटना**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कोटिंबे या गावातील शेत जमिनीचा पंचनामा करताना तेथील महसूल मंडळ अधिकारी यांनी चुकीच्या पद्धतीने पंचनामा केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.त्याचा परिणाम जमिनीचा वर्ग बदलला असून संबंधित शेतकरी या १०४ वर्षीय महिला असल्याने त्यांच्या वयोमानाचा फायदा घेऊन हा बदल केल्याचा आरोप महिला शेतकऱ्यांच्या मुलांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणी शेतकऱ्यांनी तहसीलदार प्राधिकरण यांच्याकडे तक्रार केली असून तहसीलदार आणि प्रांत अधिकारी यांनी न्याय दिला नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा शेतकरी कृष्णा जाधव यांनी दिला आहे.

कोटिंबे गावात जमीन वर्ग दोन वरून वर्ग एक करण्यासाठी महसूल विभागाचे मंडळ अधिकारी यांनी पंचनामा केला. मात्र हा पंचनामा चुकीच्या पद्धतीने केल्याचा आरोप शेतकरी कृष्णा श्रीराम जाधव यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित मंडळ अधिकारी व उपलेखापाल के. जी पालवे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी तहसिलदाराकडे करण्यात आली आहे. कोठिंबे येथील सर्वे क्रमांक १०१/८ व १०२ या जमिनीबाबत पान ५ वर

## वेधक

### मुलीवर अत्याचार करणारा अटकेत

**पनवेल** : खारघर येथील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती करणाऱ्या फरार आरोपीला अटक करण्यात खारघर पोलिसांना यश आले आहे. विशाल बाबू उर्फ अन्वर अली इम्तियाज अन्सारी (२४) असे या आरोपीचे नाव असून, पोलिसांनी त्याला भारत-नेपाळ सीमेवरून शिताफीने अटक केली आहे. न्यायालयाने या आरोपीला १ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. खारघरमधील जगदीश ऑटोपार्ट्स व्या गॅरेजमध्ये काम करणाऱ्या विशाल चावू याने ऑक्टोबर २०२५ मध्ये पीडित मुलीला गॅरेजमध्ये बोलावून तिच्यावर अत्याचार केले होते. कुणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन त्याने पीडित मुलीवर अनेकवेळा लैंगिक अत्याचार केले होते.

### गोमांस तस्करी प्रकरणात कारवाई

**पनवेल** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गोमांस तस्करी प्रकरणात प्रथमच मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणातून एका संघटित रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त प्रेरणा काटे यांनी ही माहिती दिली. पोलिसांनी मुंबईत गोमांस विक्रीसाठी नेले जात असल्याचा संशय असलेले वाहन अडवून दोन जणांना ताब्यात घेतले होते. पुढील तपासादरम्यान आणखी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, या मागे मोठे संघटित जाळे कार्यरत असल्याचे उघड झाले. यासीन शेख हा या रॅकेटचा मुख्य सूत्रधार असून बेकायदेशीर कत्तल आणि जनावरांच्या मांसाची वाहतूक करणाऱ्या टोळीच्या स्वरूपात काम करत होते.

## नेरळ जलजीवन योजना संकटात

# पाण्याचे पाईप आगीत खाक



**आगीमुळे नेरळ परिसरात धुराचे लोट**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या सक्षम समजल्या जाणाऱ्या नेरळ ग्रेमपंचायतीच्या नळपाणी योजनेचे काम अनेक वर्षे सुरू आहे. अनेक वर्ष रखडलेल्या या नळपाणी योजनेचे मोहाची वाडी येथे पडून राहिलेले पाईप तेथे लागलेल्या आगीमध्ये जळून खाक झाले आहेत. त्यामुळे आता नेरळ ग्रामपंचायतीची नळपाणी योजना संकटात आली असून या आगीमुळे नेरळ परिसरात धुराचे लोट निर्माण झाले होते. नेरळ ग्रामपंचायतचे ४० कोटींच्या जलजीवन पान ५ वर

# विना हेल्मेट प्रवास जीवघेणा | २६ महिन्यात २३६ जणांचा मृत्यू

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यामध्ये २६ महिन्यामध्ये २३६ जणांचा अपघाती मृत्यू झाल्याची माहिती आकडेवारीनुसार उघड झाली आहे. विना हेल्मेट प्रवास करणे जीवघेणा ठरला आहे. त्यामुळे आता प्रवास करताना हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. रायगड पोलिसांमार्फत कारवाईची मोहिम हाती घेण्यात आली आहे. त्यामुळे सुरक्षेसाठी हेल्मेट वापरून वाहन चालविण्यावर भर देण्याचे आवाहन



करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकरण झपाट्याने वाढत आहे. त्यात पर्यटन वाढीलादेखील चालना मिळत आहे. त्यामुळे जिल्ह्यात नागरिकीकरण वाढत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यामध्ये नोकरी व्यावसायाबरोबरच पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या प्रचंड झाली आहे. जिल्ह्यात दरवर्षी सुमारे २५ हजारहून अधिक दुचाकी खरेदी केल्या जातात. त्यामुळे दुचाकीसह चारचाकी, तीन चाकी तसेच जेसीबी, व इतर वाहनांची वर्दळ वाढली आहे. लाखोच्या संख्येने जिल्ह्यात वाहने धावतात. मात्र अनेकजण नियमांचे पालन न करता बेशिस्तपणे वाहने चालवितात. त्याचा परिणाम अनेक वेळा वाहन चालकांना अपघाताला सामोरे जावे लागले.

शनिवार व रविवारी तसेच अन्य सुट्टीच्या दिवशी जिल्ह्यात पर्यटक येतात. यातील अनेक पर्यटक दुचाकी घेऊन फिरण्यासाठी येतात. तर स्थानिक नागरिक नोकरी व्यवसायानिमित्त तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी सर्रासपणे दुचाकीचा वापर करतात. मात्र जिल्ह्यामध्ये नागरिक हेल्मेट न वापरता वाहन चालवित असतात. त्यामुळे अपघात होऊन डोक्यावर गंभीर दुखापत झाल्यावर जागेवर मृत्यू होण्याची भीती निर्माण पान ५ वर

## शिकारीसाठी ठेवलेला बॉम्ब बैलाच्या जीवावर

**■ वावडुंगीत चाऱ्यासह बॉम्ब खाल्ल्याने जबडा फाटला**

**■ शेतकऱ्यासह प्राणी मित्रांकडून हळहळ केली व्यक्त**

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यातील वावडुंगी येथे रानात चरायला गेलेल्या बैलाने चाऱ्यासह बॉम्ब खाल्ल्याने जबडा फाटून गंभीर झाला असून शेतकऱ्यांसह प्राणीमित्रांडून हळहळ व्यक्त केली आहे.

मुरुड तालुक्यातील वावडुंगी वरचीवाडी येथील शेतकरी मधुकर रामा भुवड यांच्या मालकीचा हा बैल आहे. काहीजण शिकारीसाठी गावठी बॉम्ब तयार करून रानात ठेवत असल्याचे बोलले जात असून उन्हाळा असल्याने गुरे काही गावात उनाड सोडली जातात. रानात चरत असताना बैलाने तो गावठी बॉम्ब चाऱ्यासहित खाल्ला आणि स्फोट होऊन त्याचा जबडा फाटला. ही घटना एवढी विदारक पान ५ वर

# ४५०० जणांना पाण्याची प्रतीक्षा

**१७ वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

जिल्ह्यातील धरणासह पाझर तलावांमधील जलसाठा कमी होऊ लागला आहे. पाण्याची पातळीत घट होत आहे. त्यामुळे जिल्ह्यात पाणी संकट सुरु झाले आहे. गावे, वाड्यांमधील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील १७ वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. साडेचार हजार नागरिकांना पाण्यासाठी टँकरची प्रतीक्षा करावी लागत आहे. जिल्हा टँकर मुक्तीची संकल्पना फक्त कागदावर असल्याचे दिसून आले आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार इतकी असून ८१० ग्रामपंचायती आहेत. जिल्ह्यात दोन हजारहून अधिक गावे आणि दोन हजार हून अधिक वाड्या आहेत. गावे, वाड्यांमधील नागरिकांना मुबलक पाणी मिळावे, म्हणून जिल्ह्यात लघू पाटबंधारे विभागामार्फत २४ धरणे बांधण्यात आले आहेत.

रायगड जिल्हा परिषद विभागाकडील लघू पाटबंधारे योजनेची अलिबाग, रोहा, मुरूड माणगाव या तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक असे एकूण चार, कर्जतमध्ये पाच बंधारे आहेत. अशी एकूण नऊ बंधारे आहेत. या बंधाऱ्यांची पाणी साठवण क्षमता ६.४४४ दश लक्ष घन मीटर इतकी आहे. परंतु या बंधाऱ्यांमध्ये ३.३३४ दश लक्ष घन मीटर जलसाठा शिल्लक आहे. एकूण ५० टक्केच बंधाऱ्यांमध्ये पाण्याचा साठा शिल्लक राहिला असल्याची माहिती समोर आली आहे.

या तलावांमधील जलसाठा कमी होऊ लागला आहे. जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील ३६ ठिकाणी जिल्हा परिषद विभागामार्फत पाझर तलावाची योजना राबविण्यात आली आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यात तीन, पनवेलमध्ये दोन, पेणमध्ये एक व कर्जतमध्ये पाच, खालापूरमध्ये आठ, रोहामध्ये सहा, सुधागडमध्ये दोन, तळामध्ये एक, माणगावमध्ये सहा, म्हसळामध्ये दोन योजनाचा समावेश आहे. या धरणांसह बंधारे, पाझर तलावांच्या पान ५ वर

## आणखी चारजण ताब्यात

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण बोरगाव येथील सेलिब्रेशन रिसॉर्टवरील कुंटणखाना प्रकरणात आणखी चार आरोपींचा समावेश असल्याची माहिती पेण पोलीस ठाण्यातून मिळाली आहे.

अगोदर अटक केलेले चार आरोपी जुल्फिकार जलाल उद्दिन, खगेंद्र कंम्बुमलीक, देवेंद्र पाटील, रविंद्र मलीक यांच्याकडून पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर या कुंटणखाना प्रकरणात आणखी चार आरोपींची नावे पुढे येत असून पान ५ वर

**कुत्र्यांचे निर्बीजीकरण केंद्र शस्त्रक्रिया सेंटरसह इतर सुविधा उपलब्ध | अलिबाग नगरपरिषदेचा पुढाकार**

# अलिबागमध्ये विविध कामांचे उद्घाटन अन् लोकार्पण

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अलिबाग शहरामध्ये एका दिवसात विविध कामांचे उद्घाटन आणि लोकार्पण सोहळे आयोजित करण्यात आले. अलिबाग नगरपरिषदेने पुढाकार घेत कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यासाठी शहरामध्ये अद्ययावत असे निर्बीजीकरण केंद्र करण्यात आले आहे.



(छायाचित्र : समीर मालोदे)



या केंद्राचा उद्घाटन सोहळा सोमवारी (दि.३०) नगराध्यक्ष अक्षया नाईक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, नगरसेविका ॲड. निलम हजारे, अश्विनी ठोसर, शैला भगत, योजना पाटील, ॲड. निवेदिता वाघमारे, आनंद पाटील, अनिल चोपडा, समीर ठाकूर, संदीप पालकर, जमाल सय्यद, ॲड.ऋषीकेश माळी, संतोष गुरव, सागर भगत,जनता शिक्षण मंडळाच्या प्राचार्या सोनाली पाटील, मुख्याधिकारी सागर साळुंखे, अभियंता संतोष मुंडे, विनोद साळवी, डॉ. हर्ष पाल आदी मान्यवरांसह नगरपरिषदेचे अधिकारी पान ५ वर

## पोलादपुरचा पाणीटंचाई आराखडा १ कोटी ७४ लाखांचा



**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

पोलादपूर तालुक्यातील पाणीटंचाई निवारण आराखडा तयार करण्यात आला आहे. तालुक्यातील ८५ गाव १५९ वाड्यांसाठी २४४ उपाययोजनांचा आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. याकामी १७१ लाख खर्च अपेक्षित असून यामध्ये टँकरने ४४ गावे ८१ वाडयांना पाणीपुरवठा करण्यासाठी ३७.५० लाख अंदाजित खर्च होणार आहे असल्याची माहिती तहसिल कार्यालय आणि पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाच्या दुहेरी यंत्रणेमार्फत देण्यात आली. मात्र, टंचाईनिवारणकृती आराखड्यातील गावे आणि वाड्यांचा उल्लेख पाहता जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांच्या गावांतही तीव्र टंचाई सुरू पान ५ वर

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. बिपीन ए रविंद्रन यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरले आहे. तसा साठेकराररही स्वाक्षरीत झाला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| खंडाळे | २९७ | ०-०१-८० | ०.१२ |

तसेच त्यामध्ये असलेले ग्रामपंचायत खंडाळे घर नं. ५३६ क्षेत्र १६२० चौ. फूट म्हणजेच १५०.५५ चौ. मी. ही घर मिळकत.

सबब सदरच्या मिळकतींवर अगर त्यांच्या कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर, सदरच्या मिळकती निर्वेध आणि बोजारहीत व कराराने खरेदी घेणेस योग्य आहेत, असे समजुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ता. ३१/०३/२०२६ सही/-

**ॲड. माधवी नारायण ठाकूर**
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

दिनांक : ३१/०३/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे महाळुंगे बुद्रुक, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) छाया विकास म्हात्रे, २) मानसी विकास म्हात्रे, ३) राज विकास म्हात्रे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकती ह्या निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे महाळुंगे बुद्रुक, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| महाळुंगे बुद्रुक ता. मुरुड | ३५/५ | क्षेत्र ०-६७-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण क्षेत्र ०-६९-०० | २.५६ |
| | वर नमुद मिळतीपैकी क्षेत्र ०-५०-५० हे. आर., पो. ख. ०-०२-०० हे. आर. एकुण क्षेत्र ०-५२-५० हे. आर., आकार १.९३ रू. पैसे इतक्या क्षेत्राबाबतचे | | |
| | ३५/६ | एकुण क्षेत्र ०-६२-०० | ०.८४ |
| | ३५/८ | एकुण क्षेत्र ०-१०-०० | ०.७७ |
| | ३५/९ | क्षेत्र ०-३७-००<br>पो.ख.०-०५-००<br>एकुण क्षेत्र ०-४२-०० | ५.५७ |
| | ३५/१० | क्षेत्र ०-३३-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण क्षेत्र ०-३५-०० | ४.९४ |

दिनांक : ३१/०३/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मारेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. संजय पंढरीनाथ पाटील २) श्री. प्रविण तुकाराम घरत ३) श्री. मुकेश मदनराज मेहता, ४) श्री. रमणिकलाल करमसी पटेल, ५) श्रीमती सुमित्रा मोहनलाल जैन, ६) श्री. दिलीप मोहनलाल जैन, ७) श्री. हर्षल मोहनलाल जैन, ८) श्रीमती प्रेमलता तपन जैन सर्व रा. चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (आर चौ.मी.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग | ४९/१ | ७-४१-६० | ७४-१६ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग, सही/-
दि. ३०-०३-२०२६.

**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

---

## " जाहिर नोटीस "

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे भोईघर, तालुका मुरूड, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक राजाराम गणपत पाटील यांचेकडुन आमचे आशिलांनी जमिन मिळकत खरेदी घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन -:**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे भोईघर, ता. मुरूड, जि. रायगड | २७७ | ०-१४-९०<br>पो.ख. ०-००-१०<br>एकुण ०-१५-०० | १.६२ |

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दि. ३१/०३/२०२६

**ॲड. सौ.गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक यांचे कायदेशीर वारस व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांच्या कायदेशीर वारसांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकारणी (रु.पै.) | जमिन मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| आक्षी, ता अलिबाग, जि. रायगड | २५१ | ०-३५-८० | १०.२८ | १. गीता हरीश्चंद्र गुरव,<br>२. राकेश हरीश्चंद्र गुरव,<br>३. महेश हरीश्चंद्र गुरव,<br>४. भारती हरीश्चंद्र गुरव. |

अलिबाग,
दि. २८/०३/२०२६ सही/-

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk
Near Gawade Optics, Alibag Raigad

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अनिल जोमा गांगरे, रा. कुंडेवहाळ, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ११/३ | १.८७.००<br>पो.ख ०.२६.००<br>एकुण २.१३.०० | १.२५ | श्री. आशिषकुमार अनिल दास, वैगेरे एकुण ७. |
| | यापैकी खरेदी केलेले क्षेत्र ०.३०.०० हे.आर.पॉ | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरुपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत सही /-
दिनांक :- ३१/०३/२०२६.

**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

---

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल शर्मिला रूपेश शहा हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक गणेश धाकू बावधाने, ठकू रामभाऊ बोडेकर, बालाजी शिवाजी मुंढे मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे जांभुळपाडा तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| २५/२/ब | एकूण क्षेत्र २-३०-०० पैकी<br>लिहून देणार यांचं क्षेत्र ०-२१-० | ०-६७ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (१४) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड सही/-
दि. ३१/०३/२०२६

**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
रा- जांभूळपाडा, तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर ९१६८८०१०४८

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| ३/७ | एकूण क्षेत्र ०-५८-०० हे. आर | ०.४२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ३१/०३/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो कामार्ली, ता. पेण, जि. रायगड पिन नं.४०२१०७

---

दिनांक ३१/०३/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक अनंत शांताराम पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | १६०७ | ०-५८-२०<br>पो.ख. ०-०४-००<br>एकुण ०-६२-२० | ७.४२ |
| वर नमुद जमिन मिळकतींपैकी क्षेत्र ०-२०-०० हे. आर इतक्या क्षेत्राबाबत. | | | |

दिनांक : ३१/०३/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे आंबेपूर तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील निम्नलिखित वर्णनाची जमीन मिळकत ही श्री. राजेश नारायण म्हात्रे वगैरे १ रा. आंबेपूर, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे सामाईक मालकीची असून त्यामधील त्यांचे मालकी हिश्याची ०.१२.५० हे.आर क्षेत्राची जमीन मिळकत ही माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा विक्री व्यवहाराचा साठेकरार विद्यमान मालक व माझे अशिलांमध्ये स्वाक्षरीत झालेला आहे. सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती बाबत साठेकरार, बयाणापावती, तारण, गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, अगर कोणत्याही मार्गाने गुंतविलेली असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने किंवा प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात. जर वरील मुदतीत कुणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमीन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून मागाहून आलेल्या हरकती जाणीवपूर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदरहू जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता. अलिबाग जि. रायगड | ७५/४/ब | ०.२५.००<br>पो.ख. ०.०२.५०<br>एकूण क्षेत्र ०.२७.५० | ५.३६ |
| उक्त जमीन मिळकतीमधील श्री. राजेश नारायण म्हात्रे यांच्या मालकी अविभाज्य हिश्याचे क्षेत्र ०.१२.५० हे.आर. क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे. | | | |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३१/३/२०२६

**ॲड. सुधाकर पांडुरंग प्रभू**
प्रभु निवास, अलिबाग, ता. अलिबाग
जि. रायगड मो.नं. ९८२२७९६८३०

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालक यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| लक्ष्मीबाई लक्ष्मण कोळंबे, दशरथ लक्ष्मण कोळंबे, वाळकू लक्ष्मण कोळंबे, पंढरीनाथ लक्ष्मण कोळंबे, नामदेव लक्ष्मण कोळंबे, लिलाबाई रामभाऊ मिणमिणे | ३४ | ४ | ०-०४-०० | ०-४१ |
| भुरी जानू कोळंबे | ३४ | १३/ब | ०-०६-००<br>०-०१-००<br>०-०७-०० | ०-७७ |
| चंद्रभागा माधव कोळंबे, अनिता मंगल गायकर, चंद्रकांत माधव कोळंबे, नरेश माधव कोळंबे, अनंता दुंदाजी कोळंबे, वसंत दुंदाजी कोळंबे, सुशीला बाळकृष्ण गवंडी, सिताबाई रामचंद्र रुठे | ३४ | १३/अ | ०-०५-३०<br>०-००-८०<br>०-०६-१० | ०-६७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : ३०/०३/२०२६
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री. अे. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज ४५६/२०२६

प्रति,
श्री. मुनव्वर शरफुद्दीन दळवी
रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड-जंजिरा, अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत मांडला, सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्री. मुनव्वर शरफुद्दीन दळवी, यांचा जन्म दि. ३०/०३/१९६३ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्राम पंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार श्री. मुनव्वर शरफुद्दीन दळवी जन्म दि. ३०/०३/१९६३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दिनांक १६/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे.

आज ता. १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

**जाहिर नोटीस**

ज.म.र अर्ज ४४०/२०२६

प्रति,
श्री. मुजफ्फर शरफुद्दीन दळवी
रा. मु. पो. मांडला, ता. मुरुड-जंजिरा, अर्जदार
जि. रायगड

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्राम पंचायत मांडला, सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्री. मुजफ्फर शरफुद्दीन दळवी जन्म दि. ३०/०३/१९६३ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार दि. ३०/०३/१९६३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक १६/४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.१०/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## जाहीर नोटीस

दिनांक ३१/०३/२०२६

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे नसरापुर, ता.कर्जत, जि. रायगड येथील,

| अ.क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | २६ | ४/अ | ०-१७-७० | ०-२५ |
| २ | २६ | ४/फ | ०-८६-०० | ०-८१ |
| ३ | २६ | ४/ड | ०-०८-६० | ०-०६ |
| ४ | २९ | ५ | ०-१५-५० | २-४४ |
| ५ | २५ | ४ | ०-१०-०० | ०-२८ |
| ६ | १९ | ४ | ०-३०-६० | ०-३१ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ५ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. वैभव राजेंद्र कानिटकर**
रा. गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९१७५१२०५५९

---

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे गोफण, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकती, सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ. नलिनी श्रीराम म्हात्रे आणि श्री श्रीराम शिवराम म्हात्रे यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमीची असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्यात कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा करार, वारस, गहाण, अभिहस्तांतरण, बक्षीस, निर्वाह, कब्जा, विक्री, दान, भाडेपट्टा, धारणाधिकार, भार, वहिवाट, बोजा, न्यास, पोटगी, सुविधाधिकार, हस्तांतरण, परवाना, कुळवहिवाट, अदलाबदल, कोणत्याही तंट्यात किंवा अन्य प्रकारे क्षोभीत असल्याने कोणताही दावा असल्यास किंवा कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांका पासून १५ दिवसांचे अवधीत माझेकडे खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानीशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| गोफण, ता.रोहा | ७० | १-२४-२०<br>पो.ख ०-१७-८०<br>एकुण १-४२-०० | ०.८२ |
| | सदर मिळकतीवर बांधलेले ग्रुप ग्रामपंचायत शेडसई घर मिळकत क्र.११५अ, ३६० चौ.फु व घर मिळकत क्र. ११५ब, ७५० चौ.फु या मिळकती | | |

अलिबाग सही /-
दिनांक : ३१/०३/२०२६

**(ॲड. प्रशांत एच.वर्तक)**
कार्यालय तथास्तु, गोकुळ नगर,
चेंढरे, रेवस बायपास रोड,
अलिबाग-रायगड

---

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे महाळुंगे बुद्रुक, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक सुधिर बळीराम म्हात्रे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकती ह्या निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे महाळुंगे बुद्रुक, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| महाळुंगे बुद्रुक ता. मुरूड, जि.रायगड | ३५/७ | एकूण क्षेत्र ०-३३-०० | २.५६ |

दिनांक : ३१/०३/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालक यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे नांगुर्ले, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| विक्रमजीत सिंग, दिपांजली कौर, जसमीत सिंग, गुरुकीर्पाल सिंग, सुमित सैगल | ८ | ५/अ/३ | १-७८-७०<br>०-०३-८०<br>१-८२-५० | २-०९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : ३०/०३/२०२६
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री. अे. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालक यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - आडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. अविनाश विष्णू मंडावळे, श्री.संतोष विष्णू मंडावळे | १७ | ३/क | ०-५५-६०<br>०-०७-१०<br>०-६२-७० | ९-३७ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २४ (चोवीस) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : ३०/०३/२०२६
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**श्री. अे. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड

## निवडक



### हटाळेश्वर चौकात रस्त्याची दैना

**पाली/बेणसे :** अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली येथील हटाळेश्वर चौकात रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली असून, मुख्य चौकातच एक भला मोठा खड्डा पडला आहे. यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून, भाविक आणि स्थानिकांमध्ये नगरपंचायत कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी या परिसरातून जलवाहिनी नेण्यासाठी खोदकाम करण्यात आले होते. काम पूर्ण झाल्यानंतर खड्डा केवळ मातीचा भराव टाकून बुजवण्यात आला. मात्र, त्यावर डांबरीकरण किंवा ठोस उपाययोजना न केल्यामुळे, अवजड वाहने जाऊन तसेच वाहनांच्या सततच्या वर्दळीने ही माती उखडली गेली आहे. परिणामी, या ठिकाणी आता एक खोल खड्डा तयार झाला असून, आजूबाजूला माती आणि खडी पसरली आहे. हटाळेश्वर चौक हा पालीतील अत्यंत वर्दळीचा भाग आहे. येथून बस, रिक्षा, दुचाकी आणि पायी चालणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी असते. उखडलेल्या मातीमुळे दुचाकी घसरण्याचे शक्यता आहे, तर रात्रीच्या वेळी हा खड्डा न दिसल्यास मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिसरात पसरलेल्या धुळीमुळे स्थानिक व्यापाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे.



### ‘स्मार्ट’ सिडकोचा जुना कारभार

**पनवेल :** डिजिटल इंडिया आणि स्मार्ट सिटीच्या घोषणा होत असताना, नवी पनवेलमधील सिडको कार्यालयाचा कारभार मात्र अजूनही पारंपरिक पद्धतीवरच सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. सेक्टर १ येथील कार्यालयात पाणी बिल भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना प्रत्यक्ष रांगेत उभे राहून बिल भरावे लागत आहे. यामुळे भरउन्हात नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, नोकरदार, महिला आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिकांचे हाल होत आहेत. सोमवारी सकाळी अशाच रांगेत उभ्या असलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाला उकाड्यामुळे चक्कर आल्याची घटना घडली. उपस्थितांनी तात्काळ मदत केल्याने पुढील अनर्थ टळला. कार्यालयाबाहेर सावली किंवा शेडची कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांना तीव्र उन्हाचा सामना करावा लागत आहे. तसेच बिलांमधील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी वारंवार कार्यालयात जावे लागत असल्याची तक्रारही नागरिकांनी व्यक्त केली. नवी मुंबईसारख्या नियोजित शहरातही ऑनलाईन बिल भरण्याची सुविधा उपलब्ध नसणे ही खेदजनक बाब असल्याचे नागरिकांचे मत आहे. आम्ही कर वेळेवर भरतो, मग साध्या बिलासाठी रांगेत का उभे राहावे? असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.



### ४३ इमारतींना पाण्याचा तुटवडा

**रेवदंडा :** उलवेतील बामणडोंगरी सिडको वसाहतीमधील अनंता टॉवर गृहप्रकल्पातील ४३ इमारतींमध्ये राहणाऱ्या सुमारे पाच हजारांहून अधिक कुटुंबांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. घराचा ताबा मिळून वर्ष उलटूनही नियमित पाणीपुरवठा न झाल्याने संतप्त रहिवाशांनी शुक्रवारी सिडकोच्या उलवे कार्यालयावर हंडा मोर्चा काढत जोरदार आंदोलन केले. सिडकोच्या नियोजनातील त्रुटी आणि देखभालीतील दुर्लक्ष यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. सुरुवातीला पाणीपुरवठा सुरळीत होता; मात्र ऑगस्ट २०२५ पासून टंचाई तीव्र झाली. सिडकोने प्रकल्पासाठी सहा पाणी क्लस्टर तयार केले असले तरी एका क्लस्टरला पाणी मिळते, तर दुसऱ्या क्लस्टरमध्ये दोन-दोन दिवस पाणी येत नसल्याची स्थिती आहे. या टंचाईमुळे रहिवाशांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असून, पिण्याच्या पाण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. रहिवाशांनी सिडकोच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, प्रकल्प उभारताना पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्यात आले नव्हते का, निधीचा गैरवापर झाला का, अशी शंका व्यक्त केली. तसेच सिडको ही शासनाच्या महसूल विभागांतर्गत संस्था असतानाही या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.


### तालुक्यात एसआरआय मॅपिंगला वेग

**म्हसळा :** महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या मतदार यादीतील एसआरआय मॅपिंग प्रक्रियेला म्हसळा तालुक्यात चांगला प्रतिसाद मिळत असून, हे काम सध्या प्रगतीपथावर आहे. तालुक्यात आतापर्यंत सुमारे ६० ते ७० टक्के मॅपिंग पूर्ण झाल्याची माहिती समोर येत आहे. एसआरआय मॅपिंग प्रक्रियेत शहर तसेच ग्रामीण भागातील नागरिकांनी २००२ च्या मतदार यादीच्या आधारे आपल्या आई-वडील किंवा आजी-आजोबा यांच्या नावाशी सध्याच्या मतदार नोंदीचे मॅपिंग करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमुळे मतदारांच्या नोंदी अधिक अचूक व सुसंगत होण्यास मदत होत आहे. या कामासाठी नियुक्त करण्यात आलेले बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) नागरिकांना योग्य मार्गदर्शन करत असून नागरिकांकडूनही चांगले सहकार्य मिळत आहे. त्यामुळे मॅपिंग प्रक्रिया जलद गतीने पूर्ण होत असल्याचे दिसून येत आहे.

मतदारांनी वेळेत एसआरआय मॅपिंग पूर्ण करून घेतल्यास भविष्यातील निवडणूक प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, असे निवडणूक प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. तसेच ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आवाहन निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व मतदारांना केले आहे.

# खारगाव खुर्द ग्रामपंचायतीला टाळे

- **विविध दाखले मिळवण्यासाठी ग्रामस्थांचे हाल**
- **सात दिवसांत सुरू न केल्यास आंदोलनाचा इशारा**



● (छायाचित्र : उदय कळस)

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील खारगाव खुर्द येथील ग्रामपंचायत कार्यालय गेल्या काही दिवसांपासून कुलूपबंद असल्याने ग्रामस्थांचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज ठप्प झाले आहे. ५ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रायगडने लाचप्रकरणी ग्राम अधिकारी व प्रशासकांवर कारवाई केल्यानंतर कार्यालय बंद करण्यात आले असून, अद्याप ते सुरू करण्यात आलेले नाही.

कार्यालय बंद असल्यामुळे विविध दाखले मिळविणे, घरपट्टी भरणा, पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती आदी महत्त्वाची कामे रखडली आहेत. “कार्यालय बंद असेल तर नागरिकांनी जायचे कुठे?” असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी मोर्चा काढत म्हसळा तहसील कार्यालयावर धडक दिली आणि मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले. तहसीलदार श्रीमती आंबुर्ले यांच्या हस्ते हे निवेदन स्वीकारण्यात आले.

ग्रामस्थांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी माधव जाधव यांच्यावरही आरोप करत, त्यांनी ग्रामपंचायत कार्यालय पूर्ववत सुरू करण्यास असमर्थता दर्शवून ग्रामस्थांना वेठीस धरले असल्याचे म्हटले आहे. तसेच भ्रष्टाचार करणाऱ्यांना पाठीशी घालण्यात येत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीचे कार्यालयत बंद असल्याने सर्वसामान्य जनतेचे हाल होत आहेत. त्यांना वेळेवर कागदपत्र मिळत नसल्याने पुढील कामे खोळंबली असून, अडथळा निर्माण होत आहे. दरम्यान, गावातील गंभीर समस्यांकडे लक्ष वेधत ग्रामस्थांनी प्रशासनाला ७ दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय सुरू करून ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा महिला मंडळासह सर्व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे.

आमच्या मागण्या योग्य असून, त्या तातडीने पूर्ण न झाल्यास आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे. मोर्चा व निवेदन सादर करताना माजी सभापती महादेव पाटील, गाव अध्यक्ष बाळकृष्ण म्हात्रे, आली अध्यक्ष लक्ष्मण पाटील, रामभाऊ लोणशीकर, विश्वास खोत, चंद्रकांत कांबळे, नरेश मेंदडकर, बाळा म्हात्रे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## भोंदूबाबा अशोक खरातवर कठोर कारवाई करा

### तृप्ती देसाईंकडून संताप व्यक्त

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

स्वतःला ‘कॅप्टन’ म्हणवणारा भोंदूबाबा अशोक खरात याने केलेल्या कृत्यांमुळे महाराष्ट्राची प्रतिष्ठा मलिन झाली असून, त्याच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी जोरदार मागणी तृप्ती देसाई यांनी केली. माध्यमांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. अंधभक्तांमुळे अशोक खरातसारख्या विकृत भोंदूंचे फसवणुकीचे रॅकेट सुरू राहते, असा आरोप करत मंदिर वगळता त्याच्या सर्व मालमत्तेवर सरकारने बुलडोझर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.




● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

या प्रकरणात राजकीय व प्रशासकीय स्तरावरून दडपशाही करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करत, अशा व्यक्तींवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच अशोक खरात प्रकरणात तब्बल नऊ मंत्र्यांची नावे समोर येत असल्याचे धक्कादायक असल्याचे त्यांनी नमूद केले.

रूपाली चाकणकर यांचा उल्लेख करत देसाई म्हणाल्या की, त्यांच्या कार्यकाळातील काही बाबींची चौकशी होणारच असून, संबंधित पुरावे एसआयटीकडे सादर करण्यात आले आहेत. त्यांनी पदाचा राजीनामा दिला ही उशिराने का होईना योग्य बाब असल्याचेही त्यांनी म्हटले.

पीडित महिलांचे अश्लील व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे सांगत, असे व्हिडिओ प्रसारित करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली. यासंदर्भात एसआयटी प्रमुख तेजस्विनी सातपुते यांची भेट घेऊन संबंधितांवर मकोका अंतर्गत कारवाईची मागणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. भूमाता ब्रिगेडमार्फत गावोगावी जाऊन बलात्कारमुक्त महाराष्ट्रासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

## भोंदूबाबांविरोधात अंनिसची जनजागृती मोहीम




**| चिरनेर | प्रतिनिधी |**

विवेक जागर संस्थेंतर्गत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) मुंबई जिल्ह्याच्या वतीने राज्यभर गाजत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अंधश्रद्धा विरोधी जनजागृती मोहीम राबविण्यात आली. ही मोहीम २९ मार्च रोजी दादर (पश्चिम) येथील स्टेशन परिसरात पार पडली.

यावेळी अंनिसचे राज्य पदाधिकारी विजय परब, नंदकिशोर तळाशीलकर, रुपेश शोभा, नवी मुंबईचे राजेंद्र पंडित तसेच दादर, दहिसर, कुर्ला, घाटकोपर, चेंबूर या शाखांतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय आनंद पटवर्धन, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे शरद डीचोलकर आणि विविध सामाजिक संस्था व समविचारी संघटनांचे प्रतिनिधीही सहभागी झाले होते.

अंकज्योतिष, फलज्योतिष, वास्तू, मंतरलेले पाणी, अघोरी पूजा अशा गोष्टींमुळे समस्या सुटत नसून त्या अंधश्रद्धेला खतपाणी घालतात, असेही कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले. संदेश बालगुडे यांनी ज्योतिष हे शास्त्र नसल्याचे उदाहरणांसह सांगत जनजागृती केली. जादूटोणाविरोधी कायद्याबाबत माहिती देताना नंदकिशोर तळाशीलकर यांनी सांगितले की, या कायद्यामुळे अनेक भोंदूंचा पर्दाफाश झाला आहे. हा कायदा सर्व धर्मीयांना लागू असून, त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली. पीडितांना मदत व तक्रार नोंदवण्यासाठी अंनिसने हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिले आहेत. विजय परब (९८६९०७७४६२), अर्चना सोनवणे (९८२१५२२६२६), यश सूर्यवंशी (९६६५०४०८१८), रुपेश शोभा (९००४२८२६६३), प्रियांका सवाखंडे (९८९२५१६६१८) तसेच राज्यस्तरीय संपर्कासाठी कृष्णा चांदगुडे (९८२२६३०३७८) आणि महेंद्र दातरांगे (९७६३२९२३५६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पीडितांना मोफत कायदेशीर मार्गदर्शन व समुपदेशन दिले जाणार असून, तक्रारदारांची ओळख गोपनीय ठेवली जाईल, असेही अंनिसकडून सांगण्यात

## बुवाबाजीविरोधात संविधान कट्ट्यावर निषेध सभा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

बुवाबाजीच्या आडून महिलांचे शोषण करणाऱ्या अशोक खरात याच्यावर तातडीने कठोर कारवाई करावी आणि पीडित महिलांना न्याय मिळावा, या मागणीसाठी संविधानप्रेमी नागरिकांच्या वतीने रविवारी (दि. २९) खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथील संविधान कट्ट्यावर निषेध सभा आयोजित करण्यात आली.




यावेळी समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि महिलांवरील अत्याचारांविरोधात एकजूट दाखवत जनजागृती करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. “अंधश्रद्धा मोडू या, विचारांनी जोडू या!” अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

सभेला मारुती शेरकर, अरविंद लोहार, विजय मोरे आणि प्रवीण जठार उपस्थित होते. त्यांनी संविधानाच्या मूल्यांवर आधारित सामाजिक परिवर्तनाची गरज अधोरेखित करत संबंधित दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली. ही निषेध सभा शांततापूर्ण वातावरणात पार पडली. आगामी काळात अंधश्रद्धा आणि महिलांवरील अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने लढा सुरू ठेवण्याचा निर्धार उपस्थित नागरिकांनी व्यक्त केला.

### सरकारवर नाराजी

**कोलाड :** भोंदूबाबा खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मिनिडोअर रिक्षा चालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. मिनिडोअर चालक विश्वास बागुल यांनी सांगितले की, खरातसाठी मंदिर, पाणी लाईन अशा सुविधांवर कोट्यवधींचा खर्च करण्यात आला, तर दुसरीकडे राज्यातील पाणीटंचाईची समस्या गंभीर आहे. याशिवाय मिनिडोअर चालकांकडून पासिंगच्या नावाखाली दंडापायी दरवर्षी २० ते २५ हजार रुपये खर्च करावे लागतात. सरकारने आमच्यासाठीही सन्मान योजना सुरू करून दरमहा १० हजारांची मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

## माहिती देण्यास पुरवठा अधिकाऱ्यांची टाळाटाळ

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलच्या पुरवठा विभागात सावळागोंधळ गेल्या काही महिन्यांपासून सुरूच आहे. अनेक नागरिकांचे काम न होताच त्यांना परत जावे लागत आहे. त्यातच पुरवठा अधिकारी ज्येष्ठ नागरिक, पत्रकार किंवा कोणीही व्यक्ती आले तरी त्यांना बसायला सांगत नसल्याने नागरिकांचा रोष वाढत आहे.

पनवेल पुरवठा विभागातून अनेक रेशन दुकानदारांना जास्तीची दुकाने जोडली गेली आहेत. त्याचा त्रास दुकानदारांनादेखील होत आहे. अधिकचा माल आल्यास तो ठेवायचा कोठे, असा प्रश्न त्यांच्यासमोर उपस्थित होतो. मात्र, अद्यापदेखील जाहीरनामे काढण्यात आलेले नसल्याचे समोर आले आहे. यातील काही रेशन दुकानदारांना इतर जोडलेली दुकाने नको आहेत, तरीदेखील त्यांना दुकाने जोडण्यात आलेली आहेत. याबाबतची माहिती घेण्यास काही नागरिक गेले असता पुरवठा अधिकारीयांनी जाहीरनाम्याची माहिती देण्यास टाळाटाळ केली आणि तहसीलदारांनी सांगितले तरच माहिती देईन, असे सांगितले. त्यानंतर तहसीलदारांसोबत संपर्क साधला असता तहसीलदारांनी ती माहिती पुरवठा अधिकारी यांना देण्यास सांगितले.

## हिंद टर्मिनलची मुजोरी; शेतकऱ्यांचे रस्ते बंद

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील चिरनेर-कळंबुसरे हद्दीत उभारण्यात आलेल्या हिंद टर्मिनलमुळे स्थानिक शेतकऱ्यांचे शेतावर जाण्याचे पारंपरिक मार्ग बंद झाल्याने मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कंपनीने उभारलेल्या संरक्षण भिंतीमुळे शेतात ये-जा करण्यास अडथळे निर्माण झाले असून, शेतीकामे ठप्प होण्याची वेळ आली आहे.




याशिवाय, कंपनीने संपादित केलेल्या जमिनीत टाकलेल्या भरावामुळे पाण्याच्या नैसर्गिक निचऱ्याचे मार्ग बंद झाले आहेत. परिणामी भात शेतीतील पाणी योग्यरीत्या न निघाल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. या संदर्भात कळंबुसरे येथील शेतकरी अक्षय लक्ष्मण केणी यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी २० मे २०२५ रोजी उरण तहसीलदारांकडे निवेदन सादर केले होते. तहसीलदारांनी जुन्या वहिवाटीचे मार्ग पूर्ववत सुरू करण्याचे आदेश देऊनही कंपनीने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे

> **आमच्या शेतावर जाण्यासाठीचा जुना रस्ता बंद झाल्याने शेती करणेच कठीण झाले आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून मार्ग मोकळा करून द्यावा.**
>
> **– अक्षय केणी, शेतकरी, कळंबुसरे**

दरम्यान, चिरनेर व कळंबुसरे येथील ३७ शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आल्या असून, अजूनही काही शेतजमिनी शेतीखाली आहेत. मात्र, त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी मार्ग उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. कंपनीने तातडीने संरक्षण भिंत हटवून शेतकऱ्यांचे मार्ग मोकळे करावेत, अन्यथा मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

**पाच्छापूर शाळेतील विद्यार्थ्यांचा पर्यावरण रक्षणाचा संकल्प | प्लास्टिकमुक्त समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान**

# नका वापरू प्लास्टिकची थैली, हाताने शिवलेली कापडी पिशवी भली

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

वाढत्या प्रदूषणाच्या काळात प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सुधागड तालुक्यातील पी.एम. श्री जिल्हा परिषद शाळा, पाच्छापूर येथील विद्यार्थ्यांनी एक कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. इको क्लब अंतर्गत आयोजित उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने सुती कापडी पिशव्या तयार करून प्लास्टिकमुक्त समाजाचा संदेश दिला.



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

नाडसूर केंद्रांतर्गत येणाऱ्या या शाळेत मुख्याध्यापिका माधुरी पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. प्लास्टिक पिशव्यांमुळे होणारे जल, मृदा आणि प्राण्यांचे नुकसान टाळण्यासाठी सुती कापड हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे यावेळी विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. विषय शिक्षक भगवान हंबीर यांनी विद्यार्थ्यांना कापड कापणे, शिवणकाम आणि पिशवीला आकार देणे याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. शिक्षक धनाजी कोपनर आणि कविता चोभे यांनी विद्यार्थ्यांना या प्रक्रियेत प्रोत्साहन देत सर्जनशीलतेने पिशव्या तयार करण्यास मदत केली. नाडसूर केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. लहान वयातच पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्यास भविष्यात मोठे सकारात्मक बदल घडू शकतात, असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी भविष्यात केवळ कापडी पिशव्यांचाच वापर करण्याचा संकल्प यावेळी केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ कौशल्याचा विकास झाला नाही, तर सामाजिक जबाबदारीची जाणीवही निर्माण झाली आहे. शाळेच्या या उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत आहे.

## युध्द अंगणात आले

इराणचे युध्द म्हटले तर आपल्या शेजारी आणि म्हटले तर आपल्यापासून लांब होते. पण आता तेल आणि गॅसची स्थिती बिकट होत चाललेली दिसते. नरेंद्र मोदींना वारंवार कोविडची आठवण येऊ लागली आहे. कोविड काळात जसे एकजुटीने आपण संकटाचा मुकाबला केला तसा करूया असे आवाहन ते करीत आहेत. त्या अर्थाने युध्द आपल्या अंगणात आले आहे असे दिसते. टंचाई नाही असे सरकार कितीही कोकलून सांगत असले तरी लोकांचा अनुभव वेगळा दिसतो. म्हणूनच अनेक ठिकाणी गॅससाठी रांगा दिसतात. पंपांवर पेट्रोल नाही असे बोर्ड लागलेले दिसतात. लोकांना विश्वासात घेऊन काही सांगणे ही या सरकारची नीती आणि नियत नाहीच. त्यामुळे एकजुटीची भाषा ही निव्वळ गंडवागंडवी आहे. पूर्वी नोटबंदी अशीच एका रात्रीत जाहीर करण्यात आली. नंतर कोविडची टाळेबंदीही २५ मार्च २०२० पासून एकाएकी अमलात आली. आले मोदीजींच्या मना असा सगळा प्रकार होता. लाखो लोक हजारो मैल चालत गेले. त्यातले अनेक जण वाटेतच मेले. नंतर कोविडचे भाजपने प्रचंड राजकारण केले. मुंबई पालिका व महाराष्ट्र सरकारचे काम तुलनेने चांगले होते. म्हणूनच मुंबईत ऑक्सिजनचा तुटवडा कमी भासला. धारावीत कोविड पसरला नाही. कोविड शिबिरांचे कामही चांगले झाले. तरीही केंद्राने राज्य सरकारच्या चौकशीसाठी तपासणी पथक पाठवले. नंतर आजतागायत भाजपवाले उध्दव यांच्यावर कोविडमध्ये काहीच न केल्याबद्दल टीका करीत असतात. एकीकडे कोविड असताना याउलट योगींच्या उत्तर प्रदेशात व दिल्लीत माणसे ऑक्सिजनअभावी रस्त्यात तडफडून मेली. त्याच्या बातम्या करणाऱ्यांना योगींनी तुरुंगात टाकले. इकडे महाराष्ट्रात देवळे उघडा आणि सण साजरे करूद्या अशा मागण्यांसाठी भाजपने राज्य सरकारचा छळ केला. लसींच्या नावानेही मोदींनी भरपूर राजकारण केले. आधी बिहार, मध्य प्रदेश या राज्यात निवडणुका असल्याने तिथे ती फुकट देण्याचे जाहीर केले. पण नंतर न्यायालयाचा दणका आल्यावर सरसकट सर्वांना फुकट लस देण्याचे जाहीर करावे लागले.

### विश्वगुरुंचे रोड शो

मुद्दा असा की, ज्या एकजुटीची भाषा मोदी आता करीत आहेत ती त्यांनी व त्यांच्या पक्षाने तेव्हा दाखवली नव्हती. किंबहुना, गेल्या अकरा वर्षांच्या काळात या देशात सतत फूट पाडण्याचेच राजकारण त्यांनी केले आहे. आता युध्दाच्या संदर्भात लोकसभेत निवेदन करण्याची मागणी काँग्रेसने केली तेव्हा ती फेटाळण्यात आली. नंतर अचानक एक दिवस मोदींनी निवेदन केले. त्यात त्यांनी युध्दामुळे भारतापुढे आव्हानात्मक स्थिती असल्याची कबुली दिली. त्याच भाषणात त्यांनी पहिल्यांदा कोविडच्या काळातल्याप्रमाणे एकजुटीने लढण्याचे आवाहन केले. म्हणजे, विरोधक जे इतक्या दिवसांपासून म्हणत होते ते आडवळणाने यांनी मान्य केले. पण तसे दाखवले मात्र नाही. उलट देशात गंभीर स्थिती असल्याच्या अफवा पसरवणारे देशद्रोही आहेत व त्यांच्यावर कारवाई करू असे इशारे हे व यांचेच देवेंद्र फडणवीस देत आहेत. मध्यंतरी सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली. पण अशा बैठकांना स्वतः मोदी कधीही हजर राहत नाहीत. ते स्वतःला सगळ्यांपेक्षा वरचे मानतात. आताही त्यांचे सर्व लक्ष राज्य विधानसभांच्या निवडणुकांवर आहे. जगात इतकी उलथापालथ चालू असताना स्वतःला विश्वगुरु म्हणवणारे मात्र निवडणुकीचे रोड शो करण्यात मग्न आहेत. त्यातही काँग्रेसला दोष देणे हा एककलमी कार्यक्रम चालूच आहे. देशातली तेल व गॅसची स्थिती काय आहे असा सवाल काँग्रसने केला तर विरोधक राजकारण करीत आहेत असा आरोप ते करतात. पण इराण, आखाती देश किंवा रशिया या देशांशी काँग्रेसने गेल्या ७० वर्षांमध्ये जे मैत्रीपूर्ण संबंध जपले त्यांच्याचमुळे आज भारत बऱ्या स्थितीत आहे हे ते मान्य करायला तयार नाहीत. देशाला तेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठीही इतक्या वर्षात काँग्रेसनेच प्रयत्न केले होते. याउलट मोदींनी देशाला अमेरिका आणि इस्रायलच्या दावणीला बांधल्याने पंचाईत झाली आहे. इराणवरच्या हल्ल्याचा निषेध करण्याची हिंमतही मोदी सरकार दाखवू शकलेले नाही. याचे बरेच दूरगामी परिणाम होणार आहेत.

### ट्रम्पपायी वाहवत जाऊ नका

आज खुद्द अमेरिकेत व युरोपमध्ये ट्रम्प आणि त्याच्या नादान दोस्तांच्या विरोधात प्रचंड निदर्शने होत आहेत. शनिवारी सुमारे ८० लाख लोक अमेरिकेत ट्रम्पला हटवा किंवा त्याला अटक करा अशा मागण्या घेऊन रस्त्यावर उतरले. नेतान्याहू यांच्या धोरणांबद्दल तर खुद्द ट्रम्प यांच्या पक्षात तसेच युरोपमध्येही अस्वस्थता आहे. खुद्द इस्रायलमध्येही नेतान्याहू यांना विरोध आहे. इस्रायलची तथाकथित अभेद्य संरक्षण व्यवस्था भेदली गेली आहे. गेले महिनाभर सतत हल्ले झेलल्यानंतरही इराणचे क्षेपणास्त्रे डागणे चालूच आहे. आता तर येमेनमधील इराणचे पाठीराखे असलेले हुथी बंडखोर गट या युध्दात उतरले असून त्यांनी इस्रायलवर हल्ला केल्याचा दावा केला आहे. अमेरिकेने इराणच्या भूमीवर सैन्य उतरवण्याच्या धमक्या दिल्या आहेत. तर त्यांना जन्माची अद्दल घडवायला आम्ही तयार आहोत असा प्रतिइशारा इराणने दिला आहे. १९७९ मध्ये इराणमध्ये खोमेनीने इस्लामी क्रांती केली तेव्हापासून डेथ टू अमेरिका म्हणजेच अमेरिकेला नष्ट करा ही घोषणा इराणमध्ये लोकप्रिय आहे. यापूर्वी व्हिएतनाममध्ये सैन्य घुसवण्याचा अमेरिकेचा अनुभव वाईट आहे. तेथून येणारी अमेरिकी सैनिकांची प्रेते पाहून अमेरिकी जनतेत प्रचंड संताप उसळला व त्यातच निक्सनचे सरकार भस्मसात झाले होते. ट्रम्प यांनी सत्तेत येण्यापूर्वी याचीच आठवण ठेवून अमेरिका कोणत्याही युध्दात भाग घेणार नाही असे आश्वासन वारंवार दिले होते. पण आता इस्रायलच्या नादाने त्यांनी ते मोडले आहे. आणि अशा मूर्ख युध्दखोर माणसाच्या नादाने भारतानेही आपले धोरण बदलले आहे. यातून भारताचा तात्कालिक फायदा होईलही. पण भारत हा न्यायाच्या बाजूने उभा राहणारा व अलिप्त देश आहे ही आपली प्रतिमा पुसली गेल्याचा दीर्घ परिणाम आपल्याला भोगावा लागणारा आहे. दुसरीकडे देशातही मोदी सरकारची लपवाछपवी व जनतेला विश्वासात न घेण्याची प्रवृत्ती घातक आहे. सध्या होर्मूझच्या आखातातून वाहतूक पूर्ववत सुरू झाल्याने भारतात होणारा तेल व गॅसचा पुरवठा सुरळीत होईल अशी आशा आहे. पण याबाबतची वस्तुस्थिती सरकारने संसदेत व बाहेर रोजच्या रोज मांडायला हवी. केवळ टंचाई नाही किंवा विरोधक अफवा पसरवत आहेत असे म्हणून चालणार नाही. आज देशभरात गॅसच्या दुकानांपुढे जी झुंबड उडते आहे ते विरोधकांचे कारस्थान नाही. हॉटेले इत्यादींना व्यावसायिक गॅसचा पुरवठा कमी झाल्याने फटका बसलेला आहे तो स्पष्ट दिसतो आहे. इतर आयात व निर्यातीवर परिणाम झालेला आहे. याबाबत स्पष्ट कल्पना देणे व सरकार नेमके काय करीत आहे हे सांगणे हे मोदी सरकारचे कर्तव्य आहे. युध्द अंगणात आले असताना एकजुटीने मुकाबला करायचात तर सरकारचा व्यवहार प्रामाणिक हवा.

विचार

# युद्ध आणि पर्यावरणीय विनाश

***युद्ध केवळ रणांगणावर होणारी लढाई, शस्त्रास्त्रांचा मारा आणि सीमांचे राजकारण एवढ्यावरच मर्यादित नसते. युद्धाचे खरे परिणाम रणधुमाळी संपल्यानंतर समोर येतात. आखाती प्रदेशात सुरू असलेल्या संघर्षांनी पर्यावरणीय विनाशाचे संकट निर्माण केले आहे. या विनाशाचे परिणाम मानवी जीवनावरही दीर्घकालीन स्वरूपात होत आहेत. म्हणूनच आखाती युद्धाच्या पर्यावरणीय परिणामांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.***

**मिलिंद बेंडाळे**

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या इराण-इस्त्रायल संघर्षाचे परिणाम आता केवळ रणांगणापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. या युद्धाचे दुष्परिणाम पर्यावरण आणि मानवी आरोग्यावरही स्पष्टपणे दिसू लागले आहेत. तेहरानजवळील तेल साठवण केंद्रांवर झालेल्या हल्ल्यांनंतर दिसलेली 'काळी पाऊसधार' ही त्याची धोकादायक चिन्हे मानली जात आहेत. युद्धाच्या धुरामागे लपलेला हा पर्यावरणीय संकटाचा चेहरा जगासाठी गंभीर इशारा ठरत आहे. तेहरानच्या उपनगरांमधील तेल डेपो आणि शुद्धीकरण प्रकल्पांवर (रिफायनऱ्या) झालेल्या ड्रोन हल्ल्यांमुळे मोठ्या प्रमाणात आग लागली. या आगीमधून निघणारा काळा धूर वातावरणात पसरला आणि नंतर तोच पावसाच्या ढगांमध्ये मिसळून शहरावर 'काळ्या पावसाच्या' रूपाने बरसल्याचे नागरिकांनी नोंदवले. हा केवळ एक दृश्यात्मक प्रकार नाही, तर वातावरणातील विषारी प्रदूषणाचे गंभीर संकेत देणारा प्रकार आहे. विशेषज्ञांच्या मते, जळत्या तेलातून निर्माण होणाऱ्या धुरात कालिख, हायड्रोकार्बन, सल्फर डायऑक्साइड आणि इतर अनेक विषारी घटक असतात. हे घटक हवेत पसरून श्वसनसंस्थेवर गंभीर परिणाम करू शकतात. अशा प्रदूषणामुळे दमा, ब्राँकायटिस, फुफ्फुसांचे संसर्ग आणि दीर्घकालीन श्वसनविकार वाढण्याची शक्यता असते. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि गर्भवती महिलांसाठी हा धोका अधिक गंभीर मानला जातो. युद्धामुळे निर्माण होणारे प्रदूषण तात्पुरते नसते. क्षेपणास्त्रे आणि बॉम्बस्फोटांमधून जड धातू आणि रासायनिक घटक वातावरणात मिसळतात. स्फोटानंतर हे घटक हवा, माती आणि पाण्यात दीर्घकाळ टिकून राहतात. त्यांची साफसफाई करणे अत्यंत कठीण आणि खर्चिक असते. परिणामी युद्ध संपल्यानंतरही प्रदूषणाचे दुष्परिणाम अनेक वर्षे जाणवत राहतात.

१९९१ च्या आखाती युद्धात कुवैतमधील शेकडो तेलकुपांना आग लावण्यात आली होती. त्या आगीमधून निघालेला धूर हजारो किलोमीटर दूरपर्यंत पसरला होता. संशोधनानुसार त्या प्रदूषणाचा परिणाम हिमालयातील हिमनद्यांवरही झाला. त्यामुळे हिमनद्यांच्या वितळण्याची प्रक्रिया वेगाने होण्यास हातभार लागल्याचे काही अभ्यासांमध्ये नमूद केले आहे. म्हणजेच एका प्रदेशातील युद्धाचा परिणाम जगाच्या इतर भागांवरही होऊ शकतो. तेहरानच्या बाबतीत परिस्थिती अधिक चिंताजनक मानली जाते. हे शहर आधीच गंभीर वायुप्रदूषणाच्या समस्येला सामोरे जात आहे. शहरातील हवा आणि पाण्यात शिसे, कॅडमियम, क्रोमियम आणि निकेल यांसारख्या जड धातूंचे अंश आढळले आहेत. याशिवाय जीवाश्म इंधन आणि कचरा जाळल्यामुळे सल्फर डायऑक्साइडचे प्रमाणही जास्त आहे. तेहरान अल्बोर्ज पर्वतरांगांच्या पायथ्याशी वसले असल्यामुळे हवेचा प्रवाह मर्यादित राहतो आणि प्रदूषण शहरातच अडकून राहते. अशा परिस्थितीत युद्धामुळे निर्माण होणारे अतिरिक्त प्रदूषण आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू शकते. या पार्श्वभूमीवर युद्धाच्या राजकारणात पर्यावरणाचा विचार कितपत केला जातो, असा प्रश्न पडतो. आधुनिक युद्धांमध्ये अत्याधुनिक शस्त्रे वापरली जातात; परंतु त्यांच्या पर्यावरणीय परिणामांचा विचार अनेकदा दुर्लक्षित राहतो. तेलसाठे, औद्योगिक प्रकल्प आणि ऊर्जा पायाभूत सुविधा यांवर हल्ले झाल्यास होणारे परिणाम फक्त त्या देशापुरते मर्यादित राहत नाहीत. ते संपूर्ण प्रदेशाच्या पर्यावरणीय संतुलनाला धक्का देऊ शकतात.

युद्ध संपल्यानंतर दिसू शकणारे सर्वात मोठे आव्हान म्हणजे या प्रदूषणाचे अचूक मूल्यमापन आणि त्याची साफसफाई. हवा, पाणी आणि मातीतील विषारी घटकांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करणे आवश्यक असते; परंतु युद्धग्रस्त देशांमध्ये आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींमुळे हे काम अनेकदा अपुरे राहते. परिणामी, प्रदूषणाचे परिणाम पुढील पिढ्यांनाही भोगावे लागतात. इराण-इस्रायल संघर्षाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे, की युद्धाचे खरे नुकसान केवळ रणांगणावर मोजता येत नाही. त्याचा परिणाम निसर्ग, पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर दीर्घकालीन स्वरूपात होत असतो. त्यामुळे जागतिक समुदायाने युद्धाच्या पर्यावरणीय परिणामांबाबत अधिक गांभिर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. क्षेपणास्त्रे आणि बॉम्बस्फोटांच्या आवाजात अनेकदा पर्यावरणाची वेदना दडपली जाते; परंतु युद्ध थांबल्यानंतरही त्याचे दुष्परिणाम दीर्घकाळ टिकून राहतात. म्हणूनच शांततेचा मार्ग स्वीकारणे केवळ राजकीयदृष्ट्या नव्हे, तर पर्यावरणीय आणि मानवी अस्तित्वाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहे. आखाती प्रदेश हा जगातील महत्त्वाच्या तेलसाठ्यांपैकी एक मानला जातो. येथे मोठ्या प्रमाणावर तेलसाठे, रिफायनऱ्या आणि औद्योगिक पायाभूत सुविधा आहेत. युद्धाच्या काळात या ठिकाणांवर हल्ले झाल्यास पर्यावरणावर थेट परिणाम होतात. तेलसाठ्यांवर किंवा रिफायनऱ्यांवर झालेल्या बॉम्बहल्ल्यांमुळे मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल समुद्रात सांडते. या तेलगळतीमुळे समुद्री परिसंस्थेवर गंभीर परिणाम होतात. माशांचे, समुद्री पक्ष्यांचे आणि इतर सागरी जीवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन समुद्रातील जैवविविधतेला धक्का बसतो.

युद्धामुळे निर्माण होणारे वायुप्रदूषणही तितकेच गंभीर असते. बॉम्बस्फोट, जळणारे इंधन, नष्ट होणाऱ्या औद्योगिक रचना आणि रासायनिक पदार्थ यांमुळे हवेत विषारी वायू मिसळतात. हे वायू आसपासच्या प्रदेशांमध्ये पसरतात आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम करतात. यामुळे श्वसनाचे आजार, त्वचारोग, डोळ्यांचे विकार आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांची शक्यता वाढते. युद्ध संपल्यानंतरही हे प्रदूषक दीर्घकाळ वातावरणात टिकून राहतात, ही बाब अधिक चिंताजनक आहे. माती आणि पाण्याचे प्रदूषण हादेखील एक गंभीर मुद्दा आहे. युद्धात वापरल्या जाणाऱ्या दारुगोळ्यातील रासायनिक घटक, स्फोटकांचे अवशेष आणि जड धातू जमिनीत मिसळतात. या पदार्थांचा परिणाम शेतीवर होतो. अशा प्रदूषित जमिनीत पिकणाऱ्या अन्नधान्यात विषारी घटक राहू शकतात. परिणामी, अन्नसाखळीमार्फत हे विष मानवी शरीरात पोहोचते. त्यामुळे आरोग्याशी संबंधित दीर्घकालीन समस्या निर्माण होतात. पाण्याच्या स्रोतांवरही युद्धाचे गंभीर परिणाम होतात. तेलगळती किंवा रासायनिक पदार्थांमुळे समुद्र, नद्या आणि भूजल स्रोत दूषित होतात. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. अनेक ठिकाणी स्वच्छ पाण्याचा पुरवठा खंडित होतो. यामुळे संसर्गजन्य रोगांचा प्रसार होण्याचा धोका वाढतो. विशेषतः युद्धग्रस्त भागातील नागरिकांना याचा मोठा फटका बसतो. पर्यावरणीय हानीचा सामाजिक आणि आर्थिक परिणामही मोठा असतो. मासेमारी, शेती आणि पर्यटन यांसारख्या उद्योगांवर या प्रदूषणाचा विपरीत परिणाम होतो. स्थानिक लोकांच्या रोजगारावर संकट येते. उपजीविकेचे साधन नष्ट झाल्यामुळे स्थलांतर वाढून सामाजिक अस्थिरता वाढते.

युद्धामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे हवामानबदलावर होणारा परिणाम. मोठ्या प्रमाणावर इंधन जळणे, औद्योगिक संरचना नष्ट होणे आणि वाहतूक यामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन वाढते. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय समुदायाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. आंतरराष्ट्रीय कायद्यात युद्धाच्या काळात पर्यावरणाचे संरक्षण करण्याबाबत काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. तथापि, प्रत्यक्षात या नियमांची अंमलबजावणी अनेकदा अपुरी पडते. महासत्तांच्या राजकीय हितसंबंधांमुळे पर्यावरणाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाते. युद्धाचे परिणाम केवळ त्या काळापुरते मर्यादित राहत नाहीत. पर्यावरणावर झालेली जखम अनेक दशकांपर्यंत भरून येत नाही. त्याचे दुष्परिणाम पुढील पिढ्यांनाही भोगावे लागतात. आखाती प्रदेशातील संघर्ष आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतात. तो म्हणजे युद्धात कोणीही खऱ्या अर्थाने जिंकत नाही. रणांगणावर विजय मिळवला, तरी निसर्गाचा पराभव म्हणजे अखेरीस मानवजातीचाच पराभव ठरतो. त्यामुळे संघर्षांचे निराकरण शांततामय मार्गाने करण्यावर भर देणे हीच काळाची गरज आहे. युद्धाच्या धुरामागे लपलेला पर्यावरणीय विनाश हा आजच्या जगासमोरील एक मोठा इशारा आहे. हा इशारा वेळीच न ओळखल्याची किंमत संपूर्ण मानवजातीला चुकवावी लागेल. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि शांततेची स्थापना या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत, हे आजच्या जागतिक नेतृत्वाने समजून घेणे अत्यावश्यक आहे.

'कॉन्फ्लिक्ट अँड एन्व्हायर्नमेंट ऑब्झर्व्हेटरी' या ब्रिटनमधील पर्यावरणीय संशोधन संस्थेने या संघर्षानंतर आतापर्यंत पर्यावरणाला मोठे नुकसान करणाऱ्या ३०० हून अधिक घटनांची नोंद केली आहे. प्रत्यक्षात हा आकडा याहूनही मोठा असण्याची शक्यता आहे. इस्रायलने इराणच्या तेलसाठ्यांवर केलेल्या हल्ल्यानंतर तेहरानमध्ये पडलेला 'काळा पाऊस' हा त्याचाच गंभीर संकेत मानला जातो. इराणच्या दक्षिणेकडील भागातील तेल रिफायनऱ्यांवर झालेल्या हल्ल्यांमुळे हजारो टन कच्चे तेल समुद्रात झिरपत आहे. त्यामुळे समुद्री परिसंस्था धोक्यात आली असून सागरी जीवसृष्टीवर विनाशकारी परिणाम होत आहेत. याशिवाय स्फोटांमधून निघणारा विषारी धूर आसपासच्या भागांमध्ये श्वसनविकार वाढवण्यास कारणीभूत ठरत आहे. संयुक्त राष्ट्रांनी दिलेला इशारा अत्यंत महत्त्वाचा आहे. तेल रिफायनऱ्यांवरील हल्ल्यांचे गंभीर पर्यावरणीय परिणाम होऊ शकतात आणि त्याचा परिणाम हवा, पाणी आणि अन्नसाखळीवरही होऊ शकतो. संशोधनानुसार, बॉम्बस्फोटांमधून निर्माण होणारे विषारी प्रदूषक अनेक वर्षे पर्यावरणात टिकून राहतात आणि आसपासच्या समुदायांमध्ये पसरू शकतात. ही समस्या केवळ एका संघर्षापुरती मर्यादित नाही. इस्रायल-गाझा संघर्षामुळे आतापर्यंत तीन कोटी टनांहून अधिक कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन झाले असल्याचे एका ब्रिटिश अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यातही या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलेले नाही. जीनिव्हा कराराच्या अतिरिक्त प्रोटोकॉलमध्ये पर्यावरणीय हानीला युद्धगुन्ह्यांच्या चौकटीत स्थान देण्यात आले आहे; तरीही महासत्तांच्या राजकारणात संयुक्त राष्ट्रे किंवा रेडक्रॉससारख्या संस्थांचा आवाज अनेकदा दाबला जातो, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे.

चर्चा आजची

# पाणी थकबाकीला कोण जबाबदार

**प्रमोद जाधव**



जिल्ह्यात पाण्याची समस्या भेडसवात असताना जिल्ह्यातील नागरिकांवर पाणी थकबाकीचे संकट उभे राहिले आहे. एमआयडीसीद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्याची थकबाकी १३८ कोटीहून अधिक आहे. थकीत ठेवलेल्या या थकबाकीला नक्की जबाबदार कोण आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. साडेचार रुपये लिटरनुसार पाणी पुरवठा केला जात असल्याने एमआयडीसीचा दावा आहे. तर पाणी वेळेवर मिळत नाही, हे ग्रामपंचायतीकडून सांगितले जाते. थकबाकी न भरल्यास पाणी कनेक्शन बंद केल्यावर जिल्ह्यातील नागरिकांनी काय करावे असा सवाल उपस्थित केला जात आहे. अलिबाग तालुक्यासह रोहा तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतींनी या योजनेकडे पाठ केली. पाणी पुरवठ्याची २१ कोटी रुपयांची निव्वल थकबाकी न भरल्यास या ग्रामपंचायतींवर १३८ कोटीच्या थकबाकीचा भार पडणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींना पाण्याच्या थकबाकीसाठी मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून कारखान्यांना पाणी पुरवठा केला जातो. त्याच पध्दतीने गावांतील नागरिकांना पाणी मिळावे, यासाठीदेखील पाणी पुरवठा केला जातो. सुमारे एक लाख हून अधिक नागरिकांना पाणी पुरवठा करण्याचे काम एमआयडीसीद्वारे केले जाते. प्रति लिटर सुमारे साडेचार रुपये दराने पाणी नागरिकांना देण्याचे काम केले जात असल्याची माहिती एमआयडीसी विभागाकडून देण्यात आली आहे.

पाणी पुरवठा करूनही अनेक ग्रामपंचायतींकडून पाण्याच्या थकबाकीचा प्रश्न कायमच आहे. त्यामुळे दरवर्षी निव्वल थकबाकीवर दंडात्मक रक्कमेसह थकबाकीचा भार पडत आहे. महानगरपालिकांसह नगरपरिषद, नगरपालिका व ग्रामपंचायतींकडून मुळ पाणी पुरवठा थकबाकी वसूल करण्यासाठी अभय योजना सुरु करण्यात आली आहे.पाणी पुरवठ्याची निव्वल थकबाकी वसूल करून उर्वरित थकबाकी माफ करण्याचा प्रयत्न एमआयडीसीने केला आहे. मात्र अभय योजनेकडे स्थानिक स्वराज्य संस्थाची पाठ असल्याची माहती औद्योगिक विकास महामंडळाकडून सांगण्यात आले आहे. मागील तीन महिन्यात एकाही स्थानिक स्वराज्य संस्थेने या योजनेचा लाभ घेतला नसल्याची माहिती समोर आली आहे. पाणी पुरवठा थकबाकी भरण्यासाठी दंडही भरण्याची वेळ स्थानिक स्वराज्य संस्थांवर येणार असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींवर करोडो रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे. अलिबाग तालुक्यातील रेवस तिनविरा पाणी पुरवठा योजना, रेवस पाणी पुरवठा योजना एक, रेवस पाणी पुरवठा योजना दोन (जलपाडा) सह थळ ग्रामपंचायत, खानाव ग्रामपंचायत, खंडाळे ग्रामपंचायत, परहूरपाडा ग्रामपंचायत अशा ३२ ग्रामपंचायतींकडून १३४ कोटी ८१ लाख २४ हजार ८५१ रुपयांची पाण्याची थकबारी असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र अभय योजनेअंतर्गत थकबाकी भरल्यास फक्त २१ कोटी ३२ लाख २४ हजार ३५० रुपये भरावे लागणार आहेत. परंतु ग्रामपंचायतींकडून पाणी पुरवठ्याची थकबाकी अभय योजनेकडून भरण्यास टाळाटाळ झाल्याने ग्रामपंचायतींवर १३४ कोटीचा आर्थिक भार पडणार आहे. हा भार पाणीपट्टीच्या स्वरुपात सर्वसामान्यांकडून ग्रामपंचायत वसूल करणार असल्याने त्याचा नाहक त्रास सर्वसामान्यांना बसणार आहे.

जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील ३६ ठिकाणी जिल्हा परिषद विभागामार्फत तलावाची योजना राबविण्यात आली आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यात तीन, पनवेलमध्ये दोन, पेणमध्ये एक व कर्जतमध्ये पाच, खालापूरमध्ये आठ, रोहामध्ये सहा, सुधागडमध्ये दोन, तळामध्ये एक, माणगावमध्ये सहा, म्हसळामध्ये दोन योजनाचा समावेश आहे. या तलावांच्या मदतीने ग्रामीण भागाला पाणी पुरवठा करण्याचे काम ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे. या पाझर तलावांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची पातळी कमी होऊ लागल्याने पाण्याचा तुटवडा अनेक गावांना निर्माण झाला आहे. या तलावांमध्ये सध्या ५० टक्के इतका पाणी साठा शिल्लक आहे.या तलावांच्या पाण्याची क्षमता ४१९.३६ दशलक्ष घन मीटर आहे. मात्र सध्या तलावांमध्ये २०९.६८ दश लक्ष घन मीटर इतकेच पाणी शिल्लक राहिले आहे. एका बाजूला एमआयडीसीच्या थकबाकीचे संकट असताना दुसऱ्या बाजूला जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या तलावांमधील पाण्याची पातळी कमी झाली आहे. पाण्याचे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने योग्य ती भूमिका बजावून जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांवरील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी होत आहे.

लोकसंसद

### लोकप्रतिनिधी की समाजप्रतिनिधी?

मुंबईतील मलबार हिल मतदारसंघातील १६ जैन मंदिरांना प्रत्येकी पाच गॅस सिलिंडर उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी आमदार मंगलप्रभात लोढा यांनी केल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. 'ओली आयंबिल' या जैन धर्मातील धार्मिक विधीच्या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र, या मागणीमुळे लोकप्रतिनिधीच्या भूमिकेबाबत काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या प्रतिनिधीने आपल्या मतदारसंघातील सर्व नागरिकांकडे समानतेने पाहणे अपेक्षित असते. अशा वेळी विशिष्ट धर्मीय घटकासाठी वेगळी सवलत मागणे हे 'समान न्याय' या तत्त्वालाच छेद देणारे ठरते. धर्म हा वैयक्तिक आस्थेचा विषय असला, तरी सार्वजनिक संसाधनांचे वाटप समान न्यायाने व्हायला हवे. आज सर्वसामान्य नागरिक गॅस सिलिंडरच्या टंचाईचा आणि वाढत्या किमतींचा सामना करत आहेत. अनेक कुटुंबांना महिन्याचा ताळमेळ घालताना अडचणी येत आहेत. लोकप्रतिनिधीने सर्वसामान्यांच्या अशा अडचणींना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. याशिवाय, आंतरराष्ट्रीय परिस्थितीही अनिश्चिततेकडे झुकणारी आहे. इराणसारख्या देशांमधील तणावामुळे इंधनपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनीही देशवासीयांना इंधनाच्या वापराबाबत सावधगिरी बाळगण्याचे आणि अनावश्यक वापर टाळण्याचे आवाहन केले आहे. अशा वेळी उपलब्ध संसाधनांचा विवेकपूर्ण आणि न्याय्य वापर अधिक आवश्यक ठरतो. लोकप्रतिनिधीची खरी कसोटी ही सर्वांना समान न्याय देण्यात असतेएखाद्या विशिष्ट समाजघटकाला झुकते माप देण्यात नव्हे. आमदार लोढांच्या सध्याच्या मागणीमुळे मात्र वेगळेच चित्र समोर येते आणि प्रश्न पडतो की ही मागणी खरोखर जनतेच्या हिताची आहे का, की केवळ मतांच्या राजकारणाचा भाग? **– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# भगवान महावीर यांचा जन्म

३१ मार्चला सगळीकडे महावीर जयंती साजरी केली जाते. तीर्थंकर भगवान महावीर हे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर आहेत. संपूर्ण भारतामध्ये जैन धर्माचे अनुयायी महावीर जयंती मोठ्या आनंद आणि उत्साहात साजरा करतात. कारण या दिवशी. भगवान महावीर स्वामींचा जन्म बिहारमधील कुंडलपूर येथील राजघराण्यात इ.स.पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव त्रिशला आणि वडिलांचे नाव सिद्धार्थ होते. जैन समुदाय मोठ्या उत्साहात साजरा करतात. भगवान महावीर जैन धर्माचे २४ वे आणि शेवटचे तीर्थंकर आहेत. चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील त्रयोदशी तिथीला भगवान महावीर यांचा जन्म झाला. त्यामुळे हा दिवस जैन समुदायातील लोक महावीर जयंती म्हणून साजरा करतात.

भगवान महावीर हे जैन धर्माचे संस्थापक आणि चोविसावे तीर्थंकर होते. भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त जैन धर्माचे अनुयायी महावीर जयंती साजरी करतात. जैन धर्मात, हा सण मोठ्या थाटामाटात आणि उत्साहाने साजरा केला जातो. त्यांचा जन्म ५४० मध्ये बिहारमधील एका राजघराण्यात झाला. त्यांनी त्यांच्या आयुष्यात संपूर्ण जग फिरले आणि लोकांना सत्य आणि असत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य आणि अविश्वास याबद्दल शिकवले. म्हणूनच आजही अनेक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये महावीर स्वामींवरील निबंध आणि लेख मुलांना शिकवले जातात जे आपल्यासाठी खूप महत्वाचे आहेत.

भारताला महापुरुषांचा आणि देवदेवतांचा देश म्हटले जाते. या देशाच्या भूमीवर देव-देवतांनी अवतार घेतले आणि महान कार्य केले आणि ऋषी-मुनींनी ज्ञानाची गंगा पसरवली. त्यांचे आणि त्यांच्या महान कार्यांचे स्मरण करण्यासाठी आम्ही दरवर्षी त्यांचा वाढदिवस साजरा करतो.त्या अवतारी परमपुरुषांपैकी एक म्हणजे भगवान महावीर, जे मानवाच्या मनातील वाईट विचार काढून टाकण्यासाठी आणि त्याला प्रत्येक निर्जीव आणि सजीव प्राण्याचे कल्याण करण्यास सक्षम बनवण्यासाठी या देशाच्या पवित्र भूमीवर अवतार घेतले होते. मानवांना दया, अहिंसा आणि मनाची शुद्धता शिकवणारे महावीर यांचा जन्म बिहारच्या वैशाली राज्यातील राजघराण्यात झाला, परंतु लहानपणापासूनच त्यांना सरकारी काम किंवा संपत्ती इत्यादींबद्दल कोणतेही आकर्षण नव्हते.ते ध्यानात मग्न झाले आणि ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जैन धर्माचा प्रचार सुरू केला. त्याच भगवान महावीरांचा जन्मदिवस महावीर जयंती म्हणून साजरा केला जातो. भगवान महावीर लहानपणापासूनच खूप तेजस्वी आणि धैर्यवान होते. शिक्षण संपल्यानंतर त्याच्या पालकांनी त्याचे लग्न राजकन्या यशोदाशी केले. लग्नानंतर त्यांना प्रियदर्शना नावाची एक मुलगी झाली. राजा सिद्धार्थ म्हणाला की महावीर स्वामींचा जन्म झाल्यापासून त्यांचे राज्य बऱ्याच संपत्तीने वाढले आणि संपूर्ण राज्य खूप वाढले, म्हणून त्यांनी प्रत्येकाच्या संमतीने आपल्या मुलाचे नाव वर्धमान ठेवले.असे म्हटले जाते की महावीर स्वामी सुरुवातीपासूनच अंतर्मुख होते; आयुष्यातल्या मायाबद्दल त्याला काहीच रस नव्हता. आई-वडिलांच्या इच्छेनुसार त्याचेही लग्न झाले होते.

बरेच राजे महाराज स्वामी महावीर कडून प्रवचन घेऊ लागले आणि तेही महावीर स्वामींचे अनुयायी झाले. बिंबिसारालाही त्या राजांपैकी एक होता जो महावीर स्वामींचा अनुयायी बनला होता. महावीर स्वामींनी त्यांच्या शिकवणीतून प्रेम, शांती आणि अहिंसेचा संदेश दिला. यानंतर ते जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर झाले. जगभरातील जैन धर्माला मानणारे लोक महावीरांना आपले आराध्य मानतात आणि त्यांचा जन्म दिवस हा सण म्हणून साजरा करतात. भगवान महावीर हे दया आणि अहिंसेचे पुजारी मानले जातात.

## पान १ वरून

## अटल सेतू थेट अलिबागला जोडणार

क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. पर्यटन क्षेत्राबरोबरच रायगड जिल्ह्यात औद्योगिक विकास, रियल इस्टेटच्या व्यवसायाला गती मिळणार आहे. कोस्टल कॉरिडॉरची निर्मितीमुले अलिबागसह कोकणातील सर्व जिल्ह्यांचा मुंबईकडे जाण्याचा प्रवास सुखकर आणि वेळ आणि इंधनाची बचत करणारा ठरणार आहे. रायगड जिल्ह्यातील सागरी किनारपट्टीलगत असणाऱ्या तालुक्यांमधील गावांचा समावेश एमएमआरडीए क्षेत्रात करण्यात आला आहे. यामध्ये पनवेल, उरण, पेण, अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यातील गावांचा समावेश आहे. एकीकडे कोस्टल कॉरिडॉरचे काम उरण तालुक्यात सुरु असताना दुसरीकडे एमएसआयडीसी मार्फत अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील किनारपट्टी भागातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणाला गती आली आहे. अलिबाग शहरानजीकच्या बायपास पासून मुरुडकडे जाणाऱ्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. अलिबाग ते मुरुड जाणारा रस्ता रुंदीकरण करण्याचे काम दिवसरात्र सुरु आहे. या रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर हाच रस्ता कोस्टल कॉरिडॉरला जोडला जाण्याची शक्यता जाणकारांनी व्यक्त केली आहे.

## महसूल विभागाची चुक; वृद्ध महिलेची फसवणूक

२२ डिसेंबर २०२५ रोजी काळुराम वाळकु सोनवणे यांनी वर्ग २ जमीन वर्ग १ करण्यासाठी तहसिलदार कार्यालयात अर्ज केला होता या अर्जावरून तहसिलदारांनी मंडळ अधिकारी कशेळे यांना पडताळणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. महसूल मंडळ अधिकाऱ्यांनी अहवाल केल्यानंतर तहसिलदारांकडून वर्ग दोनचे वर्ग एकमध्ये रूपांतर करण्याचे आदेश जारी करण्यात आले. यानंतर १६ जानेवारी तलाठी कोठिंबे यांनी संबंधित नोंद केली. मात्र हा अहवाल चुकीच्या माहितीवर आधारित असल्याचा दावा करीत कृष्णा श्रीराम जाधव यांनी १९ जानेवारी रोजी हरकत नोंदवली तरीदेखील मंडळ अधिकारी कशेळे यांनी २५ जानेवारी २०२६ रोजी म्हणजे सुट्टीच्या दिवशी रविवारी हि नोंद मंजूर केल्याचा आरोप आहे. पंचनामा करताना ग्रामस्थ म्हणून ज्यांची नावे दाखवली गेली ते पंच गावाबाहेरील असून त्यांचा संबंधित जमिनीशी काहीही संबंध नाही तसेच पंचनाम्यावेळी पोलीस पाटील, कोतवाल किंवा शेजारील शेतकऱ्यांची विचारणा करण्यात आली नाही, असा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. तद्नंतर सातबारा उताऱ्यावर नोंद असलेल्या व्यक्तीची संमती न घेता पंचनामा केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकाराबाबत उपविभागीय अधिकारी यांच्या कोर्टात तसेच तहसीलदार यांच्या न्यायालयात दावा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आम्हाला न्याय मिळाला नाही तर आम्ही आमच्या १०४ वर्षाच्या आजीला घेऊन कर्जत कार्यालयाच्या समोर उपोषणाला बसणार आहोत. महसूल मंत्र्यांनी सुद्धा आदेश दिले आहेत की वर्ग दोनच्या जमिनीची चौकशी करून वर्ग एक करण्याचा प्रयत्न ज्यांनी केलेला आहे. हरकत असून सुद्धा असे करणाऱ्यांवरती गुन्हा नोंद करण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे सुद्धा अर्ज केला आहे.

## विना हेल्मेट प्रवास जीवघेणा

झाली आहे. अपघातामुळे जागीत मृत्यू होण्याचे प्रमाण रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी पाऊल उचलले आहे. मोटार अपघातामध्ये मयत झालेल्यांची संख्या अधिक आहे. विना हेल्मेट प्रवास केल्याने हा मृत्यू झाल्याचे आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यामध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२४ या वर्षात ११०, जानेवारी ते डिसेंबर २०२५ मध्ये १०४ असे २१४ जणांचा मृत्यू झाला आहे. २०२४च्या तुलनेने मृत्यूचे प्रमाण कमी असले तरी या दोन वर्षात मृत्यूने शंभरी ओलांडल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ या दोन महिन्यात २२ जणांचा विना हेल्मेट मृत्यू झाल्याची माहिती पोलीस दलाकडून प्राप्त झाली आहे. त्यामुळे २०२४ पासून ते आतापर्यंत या २६ महिन्यात हेल्मेट न वापरल्याने २३६ जणांचा मृत्यू झाला आहे. मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली आहे. जिल्ह्यात हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. विना हेल्मेट वाहन चालविल्यास कारवाई केली जाणार आहे. जिल्ह्यात विशेषतः महामार्गासह अन्य ठिकाणी वाहतूक पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. त्यामुळे दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करावा असे आवाहन रायगड पोलिसांकडून करण्यात आले असून ठिकठिकाणी फलक लावून जनजागृती करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

## ४५०० जणांना पाण्याची प्रतीक्षा

माध्यमातून लाखो नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. परंतू वाढत्या तापमानामुळे यामधील जलसाठा कमी होऊ लागला आहे. धरणे, तलावांमधील गाळ न काढल्याने पाण्याचा पुरवठा योग्य होत नाही. आता जिल्ह्यातील अनेक धरणे, तलावांमधून मातीमिश्रीत पाणी येत आहे. त्यामुळे पाणी टंचाईचे संकट उभे राहिले आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गणेशवाडी सरेभाग वाशी, आझाद सरेभाग वाशी, पाटुकळेवाडी सरेभाग, दत्तमंदिरवाडी सरेभाग, वर्तकवाडी सरेभाग, बेणखुरीवाडी सरेभाग, वायलाबंदर सरेभाग, सुदर्शनवाडी सरेभाग, घोघमणवाडी सरेभाग, बांधणकरवाडी सरेभाग, ध.रा. पाटील, वाडी सरेभाग, पाटुकळेबंदी सरेभाग, लक्ष्मीवाडी सरेभाग, म्हात्रेवाडी सरेभाग, आक्कादेवीवाडी सरेभाग, महादेववाडी सरेभाग या गावांमध्ये जलजीवनच्या योजना राबविण्यात आल्या. मात्र तरीदेखील पाण्याचा दुष्काळ या वाड्यांमध्ये सुरु झाला आहे. या सतरा वाड्यांमधील चार हजार ६२६ नागरिकांना पाण्यासाठी टँकरची प्रतीक्षा लागून राहिली आहे. या वाड्यांमध्ये दोन टँकरची सोय जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली असल्याची माहिती समोर येत आहे.

## आणखी चारजण ताब्यात

यामध्ये गणेश अण्णा, सुनिल कुमार मेहता, गणेश सुरेश गायकर, आणि एक आरोपीचे नाव पोलीसांनी गुप्त राखले आहे. तरी या चारही आरोपींचा शोध पेण पोलीस ठाणे करत आहेत. तसेच अगोदर अटक असलेले चार आरोपी जुल्फिकार जलाल उद्दिन, खगेंद्र कंम्बुमलीक, देवेंद्र पाटील, रविंद्र मलीक यांना ३० एप्रिलपर्यंत दिलेल्या पोलीस कोठडीची मुदत संपली असून, त्यांना न्यायालयात हजर केले असता अधिकच्या तपासासाठी पोलीस कोठडी वाढवून मिळावी अशी विनंती पोलीस खात्याकडून न्यायालयात करण्यात आल्याने सदरील चारही आरोपींना २ दिवसाच्या पोलीस कोठडीमध्ये वाढ झाली आहे. १ एप्रिल पर्यंत पोलिसांना अधिकचा तपास करण्यासाठी वेळ मिळणार आहे. जे चार आरोपी घटनास्थळावरून ताब्यात घेतले आहेत. त्यांच्या बरोबर आणि रिसॉर्ट मालकाबरोबर कोणताही भाडेतत्वाचा करार झाला नाही, अशा प्रकरची माहिती पोलिसांकडून उपलब्ध होत आहे. तसेच जर अशा प्रकारचा करार झाला असला तर तशा प्रकारचे लेखी दस्तावेज पोलीस ठाण्यात हजर करण्याचे लेखी रिसॉर्ट मालकाला कळविले होते. तरी आजपर्यंत अशा प्रकारची कोणतीही माहिती पोलीस ठाण्यात सेलिब्रेशन रिसॉर्ट मालकाकडून देण्यात आली नाही.

## पोलादपुरचा पाणीटंचाई आराखडा १ कोटी ७४ लाखांचा

झाल्याचे दिसून येत आहे. तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद गेल्या काही वर्षांपासून होत आहे. मात्र, वनराई बंधारे वगळता पाणी अडविण्यासाठी उपयुक्त उपाययोजना न झाल्याने भूजलाची पाणीपातळी खोलवर गेल्याने एप्रिल मे महिन्यांमध्ये नद्यांसह बोअरवेल आणि विहिरींच्याही पाण्याची पातळी पाणी आटण्याइतपत खोल जात असल्याचे दिसून येत आहे. नद्यांचे पाणी अडवून धरतील, असे धरणप्रकल्प नसल्याने पावसाचे पाणी नदीमार्गे थेट समुद्राला मिळत असल्याने उन्हाळयात पोलादपूर तालुक्यातील नद्या कोरड्या तर विहिरी तळाला गेल्याने जनतेच्या घशाला कोरड पडल्याचे दाहक चित्र गेली अनेक वर्षे कायम आहे. आधी टंचाई आराखडा; त्यानंतर नेमेचि येता मग पावसाळा अशी परिस्थिती दिसून येत आहे. लाखो रुपये या टंचाई आराखड्यावर खर्च झाला तरी कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने टंचाईग्रस्त गावाची नावे आराखड्यामध्ये वाढत आहेत. यंदाच्या टंचाई आराखड्यामध्ये सार्वजनिक विहिरी खोल करणे किंवा गाळ काढण्यासाठी २१ गाव व ३२ वाडयांच्या प्रस्तावावर ७९.५० लाख खर्च अपेक्षित आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ४४ गाव ८१ वाडयांच्या प्रस्तावावर ३७.५० लाख खर्च अपेक्षित आहे. विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती ०६ गावातील १४ वाड्यांसाठी ७ लाख तर विंधन विहीर काम साठी १३ गावातील ३२ वाड्यांचा समावेश आहे. यासाठी ४६ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. खासगी विहीर अधिग्रहण करणे १ गावातील अंदाजे १ लाख खर्च असे ८५ गाव १५९ वाड्यांसाठी २४४ उपाययोजनांचा आराखड्यामध्ये समावेश करण्यात आला आहे. याकामी १७१ लाख खर्च अंदाजित आहे. पोलादपूर तालुक्यात पाणी टंचाई काळात पाणी टंचाईकृती आराखड्यामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी २२ गावे २२ वाड्यांना एप्रिलपासून मागणी आल्यास टँकरने पाणीपुरवठा मंजुरीनंतर करण्यात येणार आहे. पोलादपूर तालुक्यातील जलजीवन मिशनअंतर्गत ५७ नळपाणीपुरवठा योजनांचे काम २२ ठेकेदारांमार्फत ५३ कोटी रूपयांची तरतूद खर्ची होऊन अधिकच्या प्रस्तावित आणि विस्तारीत पाणीयोजनांच्या बिलांच्या पूर्ततेसाठी मिशनचे शाखा अभियंता यांना सेवानिवृत्तीनंतरही मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, ज्या ५७ नळपाणीपुरवठा योजनांवर खर्च झाला; त्या गावांमध्येही मागील वर्षीपासून पाणीटंचाईने उग्र रूप धारण केल्याने जलजीवन योजनेचा फोलपणा उघड झाला आहे.

## कामोठ्यात एफडीएची कारवाई

या प्रकरणी मनसे पदाधिकाऱ्यांनी दुकानाचा पंचनामा करत अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर प्रशासनाने तपास करून नियमभंग आढळल्याने जय भवानी मेडिकलचे लायसन्स निलंबित करण्याची कारवाई केली. या कारवाईत मनसेचे कामोठे शहराध्यक्ष मनोज शांतीलाल कोठारी, अमोल झिंजाड, अजय चौधरी, सतीश चिकणे, रायगड जिल्हाध्यक्ष अमर पाटील यांचा पुढाकार होता. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, रुग्णांच्या आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कुठलाही पाठींबा दिला जाणार नाही. अशा बेकायदेशीर प्रकारांविरोधात मनसे भविष्यातही आक्रमक भूमिका घेईल. दरम्यान, या कारवाईमुळे परिसरातील इतर मेडिकल स्टोअर्सनाही इशारा मिळाला आहे.

## पाण्याचे पाईप आगीत खाक

मिशनमधील प्रादेशिक नळपाणी योजनेचे काम सुरू आहे. या योजनेचे काम अनेक वर्षे रखडले असून योजनेच्या कामासाठी आणलेले काळ्या रंगाचे पाईप मोहाची वाडी येथे आणून टाकण्यात आले होते. नेरळ जवळील मोहाची वाडी परिसरात जलजीवन मिशनच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात पाईपचा साठा करून ठेवण्यात आला होता. उन्हाच्या तीव्रतेमुळे परिसरातील गवताने अचानक पेट घेतला. मोहाची वाडी येथील मोकळ्या जागेत साठवून ठेवण्यात आलेल्या ते पाईप सुक्या गवताला लागलेल्या आगीमुळे जळून खाक झाले आहेत. ही आग वाऱ्यामुळे वेगाने पसरली आणि थेट पाईपच्या साठ्यापर्यंत पोहोचली. पाईप प्लॅस्टिकचे असल्याने आगीने रौद्ररूप धारण केले आणि काही वेळातच मोठ्या प्रमाणात साठा जळून खाक झाला. आगीची माहिती मिळताच नेरळ ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कर्मचाऱ्यांनी तात्काळ पाण्याचे टँकर मागवले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आणि कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे आगीचा प्रसार अधिक होण्यापासून रोखला गेला आणि मोठा अनर्थ टळला. दरम्यान, या आगीत नेमके किती रुपयांचे नुकसान झाले, याचा अधिकृत आकडा अद्याप समोर आलेला नाही. मात्र, घटनास्थळावरील दृश्य पाहता मोठ्या संख्येने पाईप निकामी झाले आहेत.

## शिकारीसाठी ठेवलेला बॉम्ब बैलाच्या जीवावर

आहे कि, तो बैल आता तोंडावाटे काही खाऊ शकणार नाही. प्रचंड वेदना होत असल्याने बैलांच्या डोळ्यात अश्रू वाहत आहेत. जबडा फाटून जीभ लोंबकळत असल्याचे पाहून शेतकऱ्याला अश्रू अनावर झाले. नांगराच्या उमद्या बैलाची अवस्था पाहून गावातील सर्व शेतकरी बांधव हळहळ व्यक्त करत आहेत. शेतकऱ्याला आणि त्या बैलाला न्याय मिळावा, अशी भावना व्यक्त केली जात आहे. याबाबत अजित कासार यांनी मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, मुरुड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. किरण यांना कळविण्यात आले असून जखमी बैलावर उपचार केले जात आहेत.

## अलिबागमध्ये विविध कामांचे उद्घाटन अन लोकार्पण

व कर्मचारी तसेच पेट फोर्स पुणे येथील संस्थेतील कर्मचारी उपस्थित होते. समुद्रकिनारी असलेल्या मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये हे केंद्र सुरु करण्यात आले आहे. भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांना या केंद्रात आणणे, त्यांना रेबीजचे लसीकरण करणे, तसेच शस्त्रक्रिया करणे. पाच दिवस त्यांच्यावर उपचार करणे त्यानंतर त्यांना निर्बीजीकरण झाल्यावर सोडण्यात येणार आहे. पहिल्या दिवशी पंधराहून अधिक कुत्र्यांना पेट फोर्स संस्थेमार्फत पकडण्यात आले आहे. त्यांच्या उपचार व लसीकरण करून त्यांना पुन्हा सोडले जाणार आहे. मोकाट कुत्र्यांची वाढती संख्या डोकेदुखी ठरत आहे. एकत्र येऊन हल्लादेखील करण्याचे संकट आहे. हे संकट दूर करण्यासाठी अलिबागमध्ये सर्व सोयी सुविधांयुक्त असे निर्बीजीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. दरम्यान अलिबाग शहरात अद्ययावत अशा सोयी सुविधांयुक्त वाहनांचा लोकार्पण सोहळा नगरपरिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आला. शववाहिका आणि सेप्टीक टाकी मैला उपसा वाहनाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी अलिबागचे बांधकाम सभापती प्रशांत नाईक, प्रदिप नाईक, सुषमा पाटील, संध्या पालकर आदीदेखील उपस्थित होते.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३१ मार्च
१) श्री. भाईलाल मनजी पटेल
श्रीबाग, अलिबाग
३१-३-१९५९

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. यांच्या वतीने प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी हे खालील कामासाठी ई-ओपन निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव** - कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील नातुवाडी, पारचुरी, कारबुडे, टीके व बेरडेवाडी बोगद्यांमधील रिमोट कंट्रोल व मॉनिटरिंग प्रणालीसाठी दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक सर्वसमावेशक देखभाल करार. **टेंडर क्रमांक: केआर/आरएन/ईएल/टी/23/2025 दिनांक 30/03/2026, अंदाजित किंमत** ₹42,18,663/- (जीएसटी वगळून) **टेंडर फॉर्म शुल्क** –नाही, **ईएमडी**- ₹84,400/ (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे), **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 20/04/2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

### दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल
४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com

**लिलाव विक्री सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन्स ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार/गहाणवटदारांना मागणी सूचना जारी करून त्यांना सदर सूचनेमध्ये उल्लेखित थकीत देय रक्कम परतावा करण्याची मागणी केली होती. तथापि, कर्जदार/गहाणवटदार, सदर देय रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियनांच्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि १४ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार/ जामीनदार/ गहाणवटदाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन (लिलाव करण्यात येणाऱ्या) | मागणी सूचनेचा दिनांक आणि थकबाकी रक्कम | निश्चित राखीव किंमत | राखीव किंमतीच्या १०% ईएमडी रु. | पाहणीचा दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. बाळाराम कृष्णा पाटील (कर्जदार), श्री. सुशील जगन्नाथ पाटील (जामीनदार), श्री. किरण हलधर पाटील (जामीनदार) आणि श्री. शिरीष भाऊ कडू (जामीनदार) | सदनिका क्र. बी-१०१, बी विंग, पहिला मजला, मातृ छाया कॉम्प्लेक्स सीएचएस लि. क्षेत्रफळ-११४२ चौ.फू., सीटीएस क्र. ११९१ आणि सीटीएस क्र. ११९१/१, मु. पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड. श्री. बाळाराम कृष्णा पाटील यांच्या नावे. | १५.०३.२०२४ आणि २९.०२.२०२४ रोजीनुसार रु. १८,७७,७८३/- अधिक ०१.१२.२०२० ते ३१.०५.२०२३ पर्यंतचे व्याज रु. ६,३०,९५२/- आणि दि. ०१.०३.२०२४ पासूनचे पुढील व्याज | रु. ६१.१६ लाख (ज्याखाली कोणताही प्रस्ताव स्वीकारण्यात येणार "नाही".) | रु. ६.१२ लाख | १०.०४.२०२६ आणि स. ११.०० ते दु. ०१.०० |

वरील उल्लेखित संपत्ती/मालमत्तांच्या लिलाव विक्री (सरफैसी कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमनांनुसार) करिता जाहीर सूचनेच्या पुढे, दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. सदर मालमत्तांकरिता "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर" आणि "जसे आहे जे आहे तत्त्वावर" फक्त लिलावाद्वारे प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत.

**लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे आहेतः-**

१. लिलाव **'जसे आहे जेथे आहे तत्त्वावर' आणि 'जसे आहे जे आहे तत्त्वावर', 'तेथे जे आहे' आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर'** आयोजित करण्यात येईल आणि "ऑफलाईन" करण्यात येईल.
२. "श्री. बाळाराम कृष्णा पाटील यांच्या नावे असलेल्या, पनवेल, तालुका-पनवेल, जि. रायगड येथील सदनिका क्र. बी-१०१, बी विंग, पहिला मजला, मातृ छाया कॉम्प्लेक्स सीएचएस लि., क्षेत्रफळ-११४२ चौ.फू., सीटीएस क्र. ११९१ आणि सीटीएस क्र. ११९१/१ या स्थावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव" असे उपरोल्लेखित केलेल्या मोहोरबंद पाकिटामधून प्रस्ताव सादर करावयास हवा आणि संभाव्य बोलीदारांनी सदर प्रस्तावाचे मोहोरबंद पाकिट खाली उल्लेखिलेल्या ठिकाणी **दि. १५ एप्रिल, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी आणावा/पाठवावा आणि ईएमडी रक्कम दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय असलेल्या डिमाण्ड ड्राफ्टद्वारे भरावी.
३. निम्नस्वाक्षरीकारांना अशा पद्धतीने प्राप्त झालेले प्रस्ताव **दि. १७.०४.२०२६** रोजी उपरोल्लेखित ठिकाणी **स. ११.०० वाजता** उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.
४. निम्नस्वाक्षरीकार यांनी कोणताही प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे आणि/लिलाव सुधारित ते रद्द करण्याचे आणि/किंवा पुढे ढकलण्याचे त्यांचे अधिकार राखून ठेवले आहेत.
५. लिलाव विक्री सरफैसी कायदा/नियमन २००२ मध्ये विहीत शर्ती आणि त्याअंतर्गत/वेबसाईटमध्ये उल्लेखित अटी आणि शर्तींच्या, तसेच इच्छुक/सहभागी होणाऱ्या बोलीदारांद्वारे सादर करावयाच्या प्रस्ताव/बोली दस्तावेजांमधील शर्तींच्या अधीन आहे.
६. उपरोल्लेखित मालमत्ता वर उल्लेखिलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.
७. यशस्वी बोलीदार/रांच्या बाबतीत सदर ठेव/वी समायोजित करण्यात येतील, अन्यथा परत करण्यात येतील. सदर इसारा रक्कम अनामत/तींवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.
८. जर यशस्वी बोलीदार भरणा करण्यास अयशस्वी ठरल्यास किंवा मोहोरबंद निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यास कशाही प्रकारे अयशस्वी ठरल्यास, याआधीच जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि जप्त केलेल्या रकमेवर त्याचा/तिचा कोणताही दावा नसेल.
९. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मुंबई येथे देय दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. यांच्या नावे मुंबई येथे देय डीडी/पे ऑर्डरद्वारे **दि. १५ एप्रिल, २०२६ रोजी सायं. ०५.०० पूर्वी** पॅन कार्ड आणि (आधार कार्ड) पत्त्याचा पुरावा समाविष्ट असलेल्या केवायसी दस्तऐवजांच्या स्कॅन केलेल्या प्रतींसह सेवा प्रदात्यास सादर करावी.
१०. निविदा उघडल्यानंतर, इच्छुक बोलीदार ज्यांनी राखीव किंमतीच्या खाली नसलेल्या त्यांच्या बोली सादर केल्या आहेत त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी देण्यात येईल.
११. किमान बोली विस्तार रक्कम **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार)** आहे.
१२. यशस्वी बोलीदार/रांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर लगेचच, याआधीच भरलेली ईएमडी समायोजित करून, विक्री किंमतीच्या रकमेची २५% जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. शिल्लक विक्री किंमतीच्या ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये विक्रीच्या मंजुरीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय आहे. जर विहीत कालावधीमध्ये शिल्लक रक्कम जमा करण्यात न आल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याने यशस्वी बोलीदारास जप्तीची पुढील सूचना देणे आवश्यक नाही.
१३. बोलीदार "कॅव्हेट एम्प्टर" (खरेदीदार सावधान) या तत्त्वाने बांधील आहेत आणि फर्म किंवा सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही भार, वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, आयकर, उत्पादन शुल्क, कामगार देणी, वीज आणि देखभाल देणी इत्यादी शोधण्यासाठी त्यांची योग्य ती तपासणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. यशस्वी बोलीदारांनी सर्व जावके म्हणजेच महापालिका कर, देखभाल/संस्था शुल्क, वीज शुल्क, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि संबंधित मालमत्तांशी संबंधित विक्री किंमतीव्यतिरिक्त सर्व जावके समाविष्ट असलेले इतर प्रासंगिक शुल्क, खर्च भरावयाचे आहेत.
१४. यशस्वी बोलीदारांनी विक्री प्रमाणपत्रावर देय नोंदणीकरण शुल्क, मुद्रांक शुल्क, कर, तारण मालमत्ता त्याच्या/तिच्या नावे हस्तांतरित करून घेण्याकरिता कोणतेही अन्य शुल्क यांसारखे प्रभार/शुल्क भरावयाचे आहेत.
१५. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावेच आणि फक्त संपूर्ण/विक्री किंमत प्राप्त झाल्यानंतरच पारित करण्यात येईल.
१६. कर्जदार, गहाणवटदार आणि जामीनदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, ते लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्तीनुसार, वरील उल्लेखित मालमत्ता खरेदीकरिता इच्छुक खरेदीदार/ग्राहक सोबत आणू शकतात.
१७. वरील सदर मालमत्तांची पाहणी पूर्व परवानगीवर आधारीत आणि प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सोयीनुसार देण्यात येईल.
१८. प्राधिकृत अधिकारी उच्चतम प्रस्ताव किंवा आणि सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधिल नाहीत आणि कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहेत.
१९. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. वरील उल्लेखित मालमत्तांवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वांकरिता जबाबदार नाही. मालमत्तेचा **'जसे आहे जेथे आहे' आणि 'जसे आहे जे आहे', 'तेथे जे आहे'** आणि 'कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर' लिलाव करण्यात येईल.
२०. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि, कोणतेही कारण न दर्शविता किंवा पूर्व सूचनेशिवाय निविदा विक्री/लिलाव रद्द करण्याचा/स्वीकारण्याचा/फेटाळण्याचा/बदलण्याचा/सुधारणा करण्याचा/पुढे ढकलण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.
२१. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्तेवर कोणताही भार अस्तित्वात नाही. दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.स विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा भार, मालमत्ता कर, किंवा शासन किंवा अन्य कोणाचीही अन्य कोणतीही देणी याकरिता जबाबदार धरता येणार नाही.
२२. विक्री दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.च्या मंजुरीच्या अधीन आहे.

**ठिकाणः पनवेल, जि. रायगड**
**दिनांकः ३१.०३.२०२६**

सही/-
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

### पनवेल महानगरपालिका, पनवेल
**ऑफलाईन निविदा सुचना**
**मलनिःस्सारण विभाग**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ऑफलाईन निविदा ब - १ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडुन मागविण्यात येत आहे.

| अ क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. (GST सोडुन) | निविदा अनामत रक्कम (रु) | कोरी निविदा किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पमपा/मल./०८/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर येथील सेक्टर-१६ मधील पारिजात सोसायटी परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. (मा. आमदार श्री.विक्रांत पाटील यांच्या आमदार निधीतुन सन २०२४-२५) | ८,१४,९०९/- | ८,२००/- | ५९०/- |

१. या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दिनांक ०१/०४/२०२६ पासून दि. ०८/०४/२०२६ पर्यत सायं ३.०० वाजेपर्यत (कार्यालयीन वेळेत ) पनवेल महानगरपालिका मलनिःस्सारण विभागात उपलब्ध होतील.
२. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्रं. १ मध्ये सादर करण्याचा आहे.
३. सीलबंद निविदा दिनांक ०८/०४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या मलनिःस्सारण विभागात स्विकारण्यात येतील.
४. प्राप्त झालेल्या निविदा शक्य असेल तर दि. ०८/०४/२०२६ रोजी दुपारी ३.०० नंतर शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
५. प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

जा.क्र/पमपा/मल.वि/३८२५/प्र.क्र.१७/२१०/२०२६
दिनांक : ३०/०३/२०२६

सही/-
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक अनिल अरगिला यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २७ | ५ | एकूण क्षेत्र ४-८२-०० पैकी विकत देणार यांचे मालकी क्षेत्र विक्री केलेले क्षेत्र ०-४०-०० | ०-२६ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/३/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता : गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळमजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९१५८३१३७३३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल द. भाग ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग.नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे चौल द. भाग ता. अलिबाग जि. रायगड | २३१०/३ | ००.४८.६० पो. ख. ००.०४.८० एकुण ००.५३.४० | २७.६० |

(वरील मिळकतीपैकी त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्री. अतुल अनंत पाटील यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ००.१५.१० हे. आर. क्षेत्रापैकी ००.०५.४० हे. आर एवढे क्षेत्र.)

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्या सहीत सादर करावा.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन कुणाचाही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक- ३१/०३/२०२६

सही/-
**ॲड. अभिषेक महेश पिसाट**
१७ अलिबाग कमर्षील कॉम्प्लेक्स, बिग स्प्लॅश हॉटेल शेजारी अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड
मो. ९५९५०३२३२०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. दिपक हरिश्चंद्र पाटील, रा. मु. बोर्ले, पो.अजिवली, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२२१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ११/३ | १.८७.०० पो.ख.०.२६.०० | १.२५ | श्री.आशिषकुमार अनिल दास, वैगेरे एकुण ७ |
| | एकुण २.१३.०० | | |
| यापैकी खरेदी केलेले क्षेत्र ०.३०.०० हे.आर.पॉ | | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ३१/०३/२०२६

सही / -
**ॲड.उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास, नानामास्तर नगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक जनार्दन धर्मा पाटील यांच्या सामाईक मालकी हक्कातील, ताबे कब्जाजील व वहीवाटीतील मौजे तळोजे मजकूर (५५३३६१), तालुका पनवेल, जिल्हा रायगड, येथील शेतजमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या विक्री करण्यात येणाऱ्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तळोजे मजकूर (५५३३६१), तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भुधारणा पद्धती | सर्व्हे/गट/ हिस्सा/उपविभाग क्रमांक | क्षेत्रफळ (हे. आर. प्रति) | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लागवडी योग्य | पोटखराबा | एकूण | रु. पैसे |
| भोगवटादार वर्ग-१ | २३/५/ब | ०-१८-२० | ०-००-५० | ०-१८-७० संपूर्ण क्षेत्रफळापैकी जमीन मालक यांच्या स्वतंत्र मालकी हक्कातील विक्री योग्य (०-०८-८५) + (०-००-५०) = ०-०९-३५ | ३.३७ |

सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी संयुक्त नावाने म्हणजेच (१) श्री. प्रमोद चंद्रकांत पाटील आणि (२) श्री. जनार्दन धर्मा पाटील हे जमिन मालक म्हणून नोंद दर्शविली आहे.

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौताज्ञापन/विक्री करारनामा/साठेखत/खरेदीखत हे आमचे अशिल आणि जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे, त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या जमीन मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकवीस (२१) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवश्यक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही व आमचे अशिल सदर जमिन मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

सही : वकील अजीत व्ही. सिंह
**अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्**
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता : ११६/११७, १ मजला, साई चेंबर, प्लॉट नं. ४४, सेक्टर - ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२-४००२ ६१४२
ई मेल-ajeet_advocate@yahoo.co.in

# जलजीवन मिशनचे काम रेंगाळले

## •खांदनमध्ये महिलांची पाण्यासाठी पायपीट, हांडे भरण्यासाठी कसरत

| नेरळ | प्रतिनिधी |

**कर्जत तालुक्यातील खांदन गावातील महिलांना आजही विहिरीवर जाऊन पाणी आणावे लागते. त्यामुळे हर घर जल ही जलजीवन मिशनचे काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. महिलांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी बाहेर जावे लागत आहे. दुसरीकडे याच गावात जिल्हा परिषद आरोग्य विभागाचा आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभी राहिली आहे.**



कशेळे जामरुख रस्त्यावर पिंगळस गावच्या अलीकडे खांदन गाव आहे. या गावामध्ये जिल्हा परिषदेची शाळा आहे. अंगणवाडी इमारत आहे आणि आता येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभे राहिले आहे. अशा २५० लोकवस्तीच्या गावासाठी जलजीवन मिशन मधून राबवण्यात आलेल्या नळपाणी योजनेचे पाणी गावात पोहचले नाही आणि त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना पायपीट करावी लागत आहे. येथील महिलांना गावच्या बाहेर असलेल्या विहिरीवर पिण्याचे पाणी आणण्यासाठी जावे लागत असून डांबरी रस्त्याच्या बाजूने या महिला वाहनाची वर्दळ असताना जीव धोक्यात घालून पिण्याचे पाणी डोक्यावर हांडे भरून घेऊन येतात. जलजीवन मिशनचे काम रेंगाळले आहे आणि त्यामुळे येथील नळपाणी योजनेचे देखील तीनतेरा वाजले आहेत. त्यामुळे महिलांवर पाण्यासाठी पायपीट करण्याची वेळ आली आहे.

या गावाचे हद्दीत आता रायगड जिल्हा परिषदेचे आरोग्य विभागाचा प्राथमिक आरोग्य केंद्र उभे राहत आहे. कशेळे येथे ग्रामीण रुग्णालय झाल्याने कशेळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आंबिवली येथे हलवण्यात आले. मात्र २० वर्षात आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्राला हक्काची इमारत मिळाली नाही त्यामुळे आजही लहानशा खोलीमध्ये आंबिवली येथे ही प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू आहे. या इमारतीचे उद्‌घाटन बाकी असून या इमारतीतून काही दिवसांनी किंवा महिन्यांनी कारभार सुरू होणार आहे. मात्र त्या दवाखान्यात राहणारे कर्मचारी, दवाखान्यात उपचार घेण्यासाठी येणारे रुग्णांना पिण्याच्या तसेच वापरासाठी पाण्याची अडचणी यांना सामोरे जावे लागणार आहे. ही बाब लक्षात घेऊन जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना राबवण्याची गरज आहे. नियोजित ठिकाणी सुरू होणारे आंबिवली प्राथमिक आरोग्य केंद्र आणि खांदन गावातील ग्रामस्थ यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्र निकाली निघणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्याचवेळी तेथील महिलांची रस्त्यांचे हांडे भरून पाणी नेण्याची कसरत थांबणार का? असा प्रश्न कायम आहे.

## मुरुडमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन

**आगरदांडा :** 'रक्तदान करुया आणि जीवनदान देऊ' या मुरूड महादेव कोळी समाज, महादेव कोळी समाज राजपुरी कोळीवाडा व डॉ. मंगेश पाटील यांचे श्रीयश हॉस्पिटल आणि शासकीय रक्तपेढी जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान सोहळाचे आयोजन २ एप्रिल रोजी सकाळी ९ ते २.०० वाजेपर्यंत मुरुड शहरातील डॉ. मंगेश पाटील यांच्या श्रीयश हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आले आहे. प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. रक्तदान हेच जीवदान, रक्तदान हेच सर्व श्रेष्ठ दान तरी रक्तदान करुया आणि जीवनदान देऊ या तरी शहरांसह पंचक्रोशी भागातील जास्तीत जास्त नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करा असे आवाहन डॉ. मंगेश पाटील यांनी केले आहे.

## निवडक

### वाहतूक पोलिसांकडून माणुसकीचे दर्शन

**माणगाव :** माणगाव वाहतूक पोलीस हे नेहमीच माणुसकीपणा दाखवीत उल्लेखनीय कामगिरी करीत असतात. या वाहतूक पोलिसांनी अशीच उल्लेखनीय कामगिरी करीत माणगाव बस स्थानक आवारात असणाऱ्या एका वयोवृद्ध महिलेला तिच्या राहते घरी सुखरूप पोहचविले. वाहतूक पोलिसांच्या या कामगिरीचे विशेष कौतुक होत आहे. सदर घटनेबाबत अधिक माहिती अशी कि, माणगाव एसटी बस स्थानक आवारात भागाबाई मांगले रा. महागाव ता. तळा या वयोवृद्ध महिला बराच उशिरा उभी होती. सदर महिलेकडे माणगाव वाहतूक पोलीस शिवराज बांडे, पोलीस कॉन्स्टेबल बोडके यांनी विचारपूस करून त्यांच्या मुलाशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांना गावाला महागावकडे जाण्यासाठी कोणतेही साधन नसल्याने वाहतूक पोलीस बांडे व बोडके यांनी सरकारी वाहन उपलब्ध करून महिलेला तसेच पोलीस पाटील मांगले व त्यांचा मुलगा प्रभाकर मांगले यांना सुखरूपपणे घरी पोहचविले. माणगाव वाहतूक पोलिसांनी हा माणुसकीपणा दाखविल्याने मांगले परिवाराने व महागाव ग्रामस्थांनी वाहतूक पोलिसांचे विशेष कौतुक केले जात आहे.





### अंधश्रध्दा विषयावर काव्य स्पर्धा

**चिरनेर :** रसायनी मोहपाडा येथे अंधश्रद्धा या विषयावर जनजागृती म्हणून काव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एल बी पाटील यांनी भूषविले होते. चांभार्ली मोहोपाड्याच्या सरपंच उमा मुंडे यांच्या हस्ते काव्यसंमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी चैतन्य पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, लवेंद्र मोकल आदी मान्यवर उपस्थित होते. काव्य स्पर्धेचे परीक्षण डॉ. राजेंर राठोड व महेंद्र यांनी केले. काव्य स्पर्धेत नरेश पाटील, अजय शिवकर, रोहिदास कवळे, कृष्णा गावडे, कल्याणी मुळे, अजीत कडलक, चेतना सावंत, बी. एन. घरत, बी. डी. पाटील, राजेंद्र जाधव, कामिनी खाने, विजय कुमावत, प्रदीप गर्जे, अनिल सोनावणे आदीनी सहभाग घातला होता. नरेंद्र दाभोलकरांचे विचार कवींनी कवितांमधून निर्भीडपणे मांडावेत असे प्रतिपादन प्रा. एल. बी. पाटील. यांनी केले होते.



### मंडळ अधिकारी-तलाठ्यांचे प्रशिक्षण

**चिरनेर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांप्रमाणे महाराष्ट्र राज्यात SIR चा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानुषंगाने सदर कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यातील पूर्व तयारी करीता १९० उरण विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या पनवेल तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांची विशेष प्रशिक्षणपर बैठक रविवारी (दि. २९) मार्च रोजी अपर तहसीलदार पनवेल यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पनवेल तालुक्यातील मंडळ अधिकारी अमोल घरत यांच्यासमवेत अन्य मंडळ अधिकारी व तलाठी तसेच सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बीअलओ उपस्थित होते. सदरचे प्रशिक्षण आविशकुमार सोनोने, डॉ. उद्धव कदम, मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार उरण यांच्या अध्यक्षतेखाली ओमेय परब यांनी दिले. सदर प्रशिक्षणा दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष काम करत असताना उद्भवणाऱ्या समस्यांचे समाधानकारकरित्या निराकरण केले.

### द.ग. महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द.ग.तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे वाणिज्य व बॅफ विभाग तसेच आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली नवोन्मेषाच्या युगातील वाणिज्य, व्यवस्थापन आणि डिजिटल अर्थव्यवस्थेतील उदयोन्मुख प्रवाह या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील परिषद शनिवारी (दि.२९) मार्च रोजी पार पडली. आय. सी. एस कॉलेज (खेड), ज्ञानदीप कॉलेज (खेड), सिद्धयोग लॉ कॉलेज (खेड) आणि तुकाराम बाबुराव कदम कॉलेज (खेड) यांच्या सहकार्याने आयोजित या परिषदेला विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सदर परिषदेचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी ॲड. टी. एल. डफळे, डॉ. बी. एम. खामकर, डॉ. चंद्रशेखर साळुंखे, डॉ. विश्वास देशमुख, प्रा. दानिश संगे, प्रा. विनोद साळुंखे, उपप्राचार्य डॉ. आर. एम. आचार्य आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. जे. आर. पांडेय यांनी आभार प्रदर्शन करून परिषदेचा समारोप केला. परिषद यशस्वी प्रा. अमरीन आडकर, प्रा. सुम्मैया अन्सारी, डॉ. जे. आर. पांडेय, प्रा. आदिल बडे, प्रा. स्वप्निल सकपाळ, प्रा. देवांक परब, प्रा. श्रावणी बक्कम, प्रा. अश्विनी शेलार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **जागा विकणे आहे :** आमची आक्षी स्तंभाजवळील २०.३ गुंठे जागा विकणे आहे. प्रवेश- अलिबाग रेवदंडा रोडवरून थेट कॉलनीचा मुख्य प्रवेश आहे. जागा पूर्ण सपाट आहे व जागेला पूर्ण कंपाऊंड आहे. जागेमध्ये २५ नारळाची व २५ सुपारीची झाडे आहेत. जागेचा प्रवेश पूर्व पश्चिम आहे. इच्छुकांनी थेट संपर्क करावा. संपर्क : ०९६१९०१६१३५
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२३ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग मो. ८७७९८०५३५३
- **अलिबागमध्ये दुकान गाळा व अलिबागपासून** दोन-तीन किमी अंतरावर २२ गुंठे जागा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




# जिंदल विद्या मंदिरात पदवीदान सोहळा

| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

जिंदल विद्या मंदिर साळाव येथे चालू शैक्षणिक वर्षासाठी यूकेजी पदवीदान समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या कुशल नेतृत्वाखाली कार्यक्रम नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला. उपप्राचार्य मंगेश बामनोटे यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाला बळ मिळाले.

समारंभात लहानग्या विद्यार्थ्यांनी आकर्षक पदवीदान पोशाख परिधान करून आत्मविश्वासाने मिरवणूक काढली. टाळ्यांच्या गजरात त्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य व गीतांच्या माध्यमातून त्यांच्या शिक्षणप्रवासाचे सुंदर चित्रण करण्यात आले. त्यांच्या निरागस सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी कार्यक्रमाचे कौतुक करत शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## माहिराचे रोजे पूर्ण

**सोगांव:** अलिबाग शहरातील गोविंद बंदर येथील माहिरा इब्राहिम शरीफ हिने आयुष्यात पहिल्यांदाच तहान भूक विसरून रमजान महिन्याचे ३० दिवसांचे रोजे (उपवास) पूर्ण केले. याबद्दल तीचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. इस्लाम धर्मातील कलमा, नमाज, रोजे, जकात, हज हे पाच प्रमुख अर्क आहेत. हे पूर्ण करणे प्रत्येक मुस्लिम समाजातील लहानांपासून मोठ्यांपर्यंतच्या महिला व पुरुषांना कोणत्याही परिस्थितीत बंधनकारक आहेत. अध्यात्मिकची ओढ अगदी लहानपणापासूनच लागावी यासाठी मुलामुलींना रोजे व नमाज पूर्ण करण्यासाठी इस्लाम धर्मात बंधनकारक करण्यात येत आहे. याच अनुषंगाने माहिरा हिने रमजानच्या पूर्ण महिन्यातील रोजे पूर्ण केले.

# पोलीस-माविम बैठकीत मान्यवरांचा गौरव

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा पोलीस ठाण्यात पोलीस व माविम मित्र मंडळ यांची संयुक्त बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सहायक पोलिस निरीक्षक बी. के. जाधव होते. बैठकी दरम्यान माविमच्या व्यवस्थापक शमीन चौधरी यांनी महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देत, त्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर सविस्तर प्रकाश टाकला. विधी सेवा प्राधिकरणाच्या स्वयंसेविका वैशाली यांनी महिलांना कायदेशीर अडचणींसाठी दर शनिवारी रेवदंडा पोलीस ठाण्यात मोफत सल्ला व वकिलांचे मार्गदर्शन उपलब्ध असल्याचे सांगून या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.



संजिवनी म्हात्रे यांनी महिलांनी आर्थिक व्यवहार करताना सजग व डोळसपणे निर्णय घेण्याची गरज अधोरेखित केली. यावेळी एपीआय जाधव यांनी महिलांनी छोटे-मोठे व्यवसाय सुरू करून आर्थिक सबलीकरण साधावे, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती करून घेत त्यांचा लाभ घ्यावा, या बद्दल मार्गदर्शन केले. यावेळी माजी एसीपी रमेश धाटावकर व प्रकाश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. प्रकाश पाटील यांनी माविमच्या कार्याचे कौतुक करत, महिला सक्षमीकरणासाठी पुरुषांनीही सहकार्य करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला ओम साई प्रेरणा साधन केंद्राच्या शलाका राऊत, सुनित्रा भुर्के यांसह इतर समन्वयक उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मोबाईल साक्षरता' प्रशिक्षण



| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुका खांब विभागातील ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी यासाठी मोबाईल साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डिजिटल युगात तंत्रज्ञान क्षेत्रात ज्येष्ठ नागरिक सक्षम व्हावे, या उद्देशाने ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था आणि आयएलसीआय यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक ग्रुप ग्रामपंचायत कार्याल खांबच्या सभागृहात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

प्रशिक्षणासाठी सुशांत सोनावणे आणि नंदकुमार सकट यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि प्रात्यक्षिकांसह ज्येष्ठ नागरिकांना मोबाईलच्या विविध फिचर्सची माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने व्हॉट्सअ‍ॅपचा वापर, सुरक्षित डिजिटल व्यवहार, ऑनलाइन सुरक्षितता आणि उपयुक्त ॲप्स कसे वापरावेत, यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

या उपक्रमात गावांतील ३५ ज्येष्ठ नागरिकांनी या प्रशिक्षणात उत्साहाने सहभाग नोंदवला. यावेळी स्वतःच्या हाताने मोबाईल हाताळताना ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता. या यशस्वी उपक्रमाबद्दल ग्रामस्थांकडून ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था आणि आयएलसीआय यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

## नेटवर्कमुळे ग्राहक हैराण

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुडसह तालुक्यातील बोर्ली-मांडला, नांदगांव, मजगांव परीसरात गेल्या चार-पाच दिवसांपासून जीओ मोबाईलला रेंज नसल्याने, मोबाईल लागत नाहीत. त्यामुळे ग्राहक वर्ग अक्षरशः हैराण असून याकडे संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षा बाबत नाराजी व्यक्त होत आहे. जीओ कंपनीच्या संबंधित अधिकारी वर्गाने यात तातडीने लक्ष पुरवून पुर्ववत सेवा उपलब्ध व्हावी अशी मागणी ग्राहक वर्गातून जोर धरत आहे.

# बालसंस्कार वर्गाची विठ्ठल मंदिरास क्षेत्रभेट



| अलिबाग | प्रतिनिधी |

आगरी समाज संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या बालसंस्कार वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार (दि.२९) मार्च रोजी वरसोली-अलिबाग येथील विठ्ठल रखुमाई मंदिर येथे शैक्षणिक सहल व क्षेत्रभेट उत्साहात आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, प्राचीन वारसा आणि आध्यात्मिक मूल्यांची ओळख व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये संस्कारांची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

गावदेवी मंदिरातून सहलीस प्रारंभ झाला. आनंदी, उत्साही व शिस्तबद्ध विद्यार्थ्यांनी विठोबा देवस्थानात पोहोचून रांगेत विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले. त्यानंतर मंदिराच्या सभामंडपात सर्व विद्यार्थी एकत्र बसले असता बालसंस्कार वर्गाच्या सुप्रिया ठाकूर यांनी मंदिराचा इतिहास व धार्मिक महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

यानंतर विद्यार्थ्यांनी मंदिर परिसरातील औषधी वनस्पतींची प्रत्यक्ष पाहणी केली. पुस्तकांमध्ये किंवा टीव्हीवर पाहिलेल्या वनस्पती प्रत्यक्ष पाहण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. या अनुभवामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडली आणि निसर्गाविषयी कुतूहल वाढले. यावेळी आगरी समाज संस्थेचे सचिव प्रभाकर ठाकूर व युवा सभासद श्रेयस ठाकूर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. आगरी समाज संस्थेमार्फत मनः शक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा प्रेरित बालसंस्कार वर्ग दर रविवारी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत ५ ते १२ वयोगटातील मुलांसाठी नियमितपणे घेतला जातो. ही सहल प्रसन्न, आनंददायी व संस्कारमूल्यांनी परिपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली.

# संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानचा बक्षीस वितरण

| कर्जत | प्रतिनिधी |

अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालय कर्जत येथे संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या नैतिक मूल्यशिक्षण अभ्यासक्रम अंतर्गत घेण्यात आल्या होत्या. कर्जत विभाग पुरस्कार बक्षीस वितरण समारंभ सोहळा संपन्न झाला. कर्जत विभागातून इयत्ता ४ थी ते ८वी वर्ग सहभागी असुन, एकूण बावीस शाळामधील २००० विद्यार्थी या परीक्षेत बसले होते. त्यातील प्रथम क्रमांक ६५ विजेते विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानतर्फे ४ थी ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे



कथा रूप रामायण, संत कथा, चरित्र रामायण, महाभारत, आणि क्रांतीगाथा या विषयावर परीक्षा घेतली जाते कारण विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार व्हावेत. आपल्या मूल्यांचे बीजारोपण व्हावे आणि भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगणारा देशभक्त नागरिक घडावा म्हणून संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानचे कार्यकर्ते सतत प्रयत्नशील असतात. संस्कार हे एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित व्हावे. यासाठी प्रतिष्ठानचे रोवलेले हे बीज आज वटवृक्षात रूपांतरित झाले असून त्याचे कार्य मोठ्या प्रमाणात विस्तारित होत आहे.

या कार्यक्रमात सहभागी मुख्याध्यापक, शिक्षक कार्यकर्ते, पालक, आणि विद्यार्थी उपस्थिती होती. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सुंदर सादरीकरण शिशु मंदिर कडाव शाळेच्या विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरूवात केली कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल जोशी तसेच संस्थापक विश्वस्त संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान मोहन सालेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख अतिथी अनुराधा भाटकर, साईनाथ श्रीखंडे उपस्थित होते.

**शेकडो नागरिकांचा मिरवणुकीत सहभाग | देशाच्या सुरक्षेसाठी मोलाचे योगदान**

# नायब सुभेदार नितीन ठाकूर सेवानिवृत्त

| खरोशी | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील दिव गावाचे सुपुत्र, देशासाठी निःस्वार्थ भावनेने तब्बल २४ वर्षे सेवा बजावणारे ऑपरेशन 'सिंदूर'चे रियल हिरो, ऑर्डिनरी नायब सुभेदार नितीन रामचंद्र ठाकूर हे भारतीय सैन्य दलाच्या सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे शौर्य, निष्ठा आणि कर्तव्य परायणतेमुळे त्यांनी समाजात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. ठाकूर यांनी आपल्या सेवाकाळात अनेक कठीण आणि धोकादायक मोहिमांमध्ये सहभाग घेत देशाच्या सुरक्षेसाठी मोलाचे योगदान दिले.

विशेषतः ऑपरेशन 'सिंदूर'मधील त्यांच्या धाडसी कामगिरीमुळे त्यांना रियल हिरो म्हणून




ओळख मिळाली. सीमारेषेवर कर्तव्य बजावताना त्यांनी अनेक आव्हानांना सामोरे जात देशसेवेचा आदर्श घालून दिला. सेवानिवृत्तीच्या निमित्ताने संपूर्ण वाशी खारेपाट विभागातर्फे गावकऱ्यांकडून, सहकारी जवानांकडून आणि कुटुंबीयांकडून भावनिक वातावरणात त्यांचा सत्कार सोहळा करण्यात आला. यानिमित्ताने शिवतेज युवा फाऊंडेशन रायगड संस्थेचे वतीने वाशी जगदंबा माता मंदिर येथे भव्य स्वागत करून माजी सैनिक संघटनेच्या वतीने मिरवणुकीने वाजत गाजत सन्मानाने वाशी-वढाव-दिव असा प्रवास करत असताना ग्रामस्थांनी पुष्पवृष्टी केली. त्यांच्या दिव येथे सत्कार समारंभ (दि.२८) मार्च रोजी झाला. यावेळी वाशी लढावं दिवस येथील सामाजिक कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून या वीर जवानाला भव्य मानवंदना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश थवई यांनी केले.

> **"तुमची देशसेवा आमच्यासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी बाब आहे. ऑर्डिनरी नायब सुभेदार नितीन ठाकूर यांचा हा प्रेरणादायी प्रवास प्रत्येक तरुणासाठी मार्गदर्शक आणि पुढील आयुष्यासाठी दिशा देणारा ठरेल."**
> -हेमंत पाटील
> अध्यक्ष शिवतेज युवा फाऊंडेशन रायगड

## हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**महाड** : तालुक्यातील भेलोशी गावातील समृद्धी ग्राम उत्कर्ष मंडळ-भेलोशी यांच्यावतीने प्रतिवर्षी साजरा करण्यात येणाऱ्या श्री हनुमान जन्मोत्सवाचे यंदा २५ वे वर्ष आहे. या रौप्यमहोत्सवी वर्षांच्या निमित्ताने अखंड हरीनाम यज्ञ व श्री सत्यनारायणाची महापूजा तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे आयोजन समृद्धी ग्राम उत्कर्ष मंडळ-भेलोशी तर्फे हनुमान जन्मोत्सव सोहळ्याच्या रौप्यमहोत्सवाची जय्यत तयारी झाली आहे. या सोहळ्याची सुरुवात बुधवार दि. १ एप्रिल रोजी होणार असून कार्यक्रमाची सांगता शुक्रवार दि.३ एप्रिल रोजी होणार आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | संपादित गांव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **ता. पनवेल, रायगड** | |
| १ | करंजाडे ३१ | वडघर ३४ | ६६/२अ<br>६६/१ब | ०-०२-३<br>०-१६-३ | १५० चौ.मी. | नोड - करंजाडे भूखंड क्र. ११०, सेक्टर-०६, क्षेत्र-१५० चौ.मी. | **कै. गोपीनाथ हरीशेठ वाणी मयत** (मृत्यू दि. १६.११.१९९५) **यांचे वारस**<br>१) श्री. विष्णू गोपीनाथ वाणी २) श्री. यशवंत गोपीनाथ वाणी ३) श्रीमती. गोपीकाबाई गोपीनाथ वाणी ४) श्रीमती. लिलावती विष्णूनाथ अंबवणे<br>वारसदाखला.CMA No ३६६/१९९७<br>**कै. गोपीकाबाई गोपीनाथ वाणी मयत (मृत्यू दि. २१.०२.२००३)**<br>**कै. यशवंत गोपीनाथ वाणी मयत (मृत्यू दि. २६.०८.१९९८)**<br>**कै. रुक्मिणी जयराम वाणी मयत (मृत्यू दि. ०८.०६.१९९३)**<br>**कै. द्वारकानाथ जयराम वाणी मयत** (मृत्यू दि. २२.०७.२००५) **यांचे वारस**<br>१) श्री. विष्णू गोपीनाथ वाणी २) श्रीमती. सुनिता यशवंत वाणी ३) श्री. सुधीर यशवंत वाणी ४) श्री. नितिन यशवंत वाणी ५) श्री. रविंद्र यशवंत वाणी ६) कै. द्वारकानाथ जयराम वाणी मयत ६.१) श्रीमती. तारा उर्फ यशोदा द्वारकानाथ वाणी ६.२) श्रीमती. संगिता बालिक पातकर ७) श्री. सुभाष जयराम वाणी ८) श्रीमती. सुलोचना बाळकृष्ण गुजरे ९) श्रीमती. प्रभावती प्रभाकर निकते<br>वारसदाखला CMA No ४४७/२००४<br>**कै. सुलोचना बाळकृष्ण गुजरे मयत** (मृत्यू दि. ०१.०७.२०१४) **यांचे वारस**<br>१) श्री. मधुकर बाळकृष्ण गुजरे २) श्रीमती. संजिवनी मधुकर तेलवणे उर्फ संजिवनी बाळकृष्ण गुजरे ३) श्री. सुधाकर बाळकृष्ण गुजरे ४) श्री. प्रदीप बाळकृष्ण गुजरे ५) श्रीमती. अश्विनी अशोक कोंडळेकर उर्फ अश्विनी अशोक गुजरे वारसदाखला CMA No ८३०/२०२५<br>**कै. प्रभावती प्रभाकर निकते मयत** (मृत्यू दि. २४.०७.२०१९) **यांचे वारस**<br>१) श्री. प्रविण प्रभाकर निकते<br>वारसदाखला CMA No ७२७/२०२५<br>**कै. लिलावती विष्णूनाथ अंबवणे मयत** (मृत्यू दि. १५.०५.२००१) **यांचे वारस**<br>१) श्री. विष्णू गोपीनाथ वाणी २) श्रीमती. सुनिता यशवंत वाणी ३) श्री. सुधीर यशवंत वाणी ४) श्री. नितिन यशवंत वाणी ५) श्री. रविंद्र यशवंत वाणी<br>वारसदाखला CMA No ८८४/२००८<br>**कै. संगिता बालिक पातकर मयत** (मृत्यू दि. ०३.१२.२०१२) **यांचे वारस**<br>१) श्री. मयुर बालिक पातकर २) श्री. विलास बालिक पातकर ३) श्रीमती. पुनम सचिन गुजरे उर्फ पुनम बालिक पातकर<br>वारसदाखला CMA No ७२४/२०२५<br>**कै. विष्णू गोपीनाथ वाणी मयत** (मृत्यू दि. १३.०१.२०१९) **यांचे वारस**<br>१) श्री. असित विष्णू वाणी<br>२) श्री. सतिश विष्णू वाणी<br>वारसदाखला CMA No ७२८/२०२५ | १) श्रीमती. सुनिता यशवंत वाणी,<br>२) श्री. सुधिर यशवंत वाणी,<br>३) श्री. नितीन यशवंत वाणी,<br>४) श्री. रविंद्र यशवंत वाणी,<br>५) श्री. असित विष्णू वाणी,<br>६) श्री. सतिश विष्णू वाणी,<br>७) श्रीमती. पुनम सचिन गुजरे,<br>८) श्री. मयुर बालीक पातकर,<br>९) श्री. विलास बालीक पातकर,<br>१०) श्री. सुभाष जयराम वाणी,<br>११) श्री. मधुकर बाळकृष्ण गुजरे,<br>१२) श्रीमती. संजिवनी मधुकर तेलवणे,<br>१३) श्री. सुधाकर बाळकृष्ण गुजरे,<br>१४) श्रीमती. अश्विनी अशोक कोंडलेकर,<br>१५) श्री. प्रदिप बाळकृष्ण गुजरे,<br>१६) श्री. प्रविण प्रभाकर निकते<br>यांचे नावे भूखंडाचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. |
| | | | | | | ०-४२-५ | | |
| २ | करंजाडे ११३ | करंजाडे १११ | १२१/३ | ०-३४-७ | ३०० चौ.मी. | नोड - करंजाडे भूखंड क्र. ५, सेक्टर-०६, क्षेत्र-२९८.४० चौ.मी. | कै. भालचंद्र नारायण पोटे मयत (मृत्यू दि. १७.०४.२००५) यांचे वारस<br>१) सुमती दत्तात्रेय पोटे २) आशा उर्फ अर्चना अशोक ठाकरे ३) सुवर्णा सुधाकर सोनटक्के ४) सुरेखा रविंद्र कामेरकर ५) काशिनाथ गुरुदेव पोटे ६) अशोक गुरुनाथ पोटे ७) निता नरेंद्र साखरे ८) सुनिल कृष्णाजी पोटे ९) राजेंद्र कृष्णाजी पोटे १०) अर्चना अशोक अंबवणे ११) सपना अनिल पोटे १२) दिपाली अनिल पोटे १३) दर्शन अनिल पोटे १४) हरिभाऊ नारायण पोटे<br>वारसदाखला.CMA No ३७/२००८<br>**कै. गुरुनाथ नारायण पोटे मयत** (मृत्यू दि. १५.०५.२००१) व कै. शांताबाई गुरुनाथ पोटे मयत (मृत्यू दि. ०९.१०.२००७) यांचे वारस<br>१) श्री. काशिनाथ गुरुनाथ पोटे २) श्री. अशोक गुरुनाथ पोटे ३) श्रीमती. निता नरेंद्र साखरे<br>वारसदाखला CMA No ५२५/२००९<br>**कै. दत्तात्रय नारायण पोटे मयत** (मृत्यू दि. ०८.०७.२०१८) व **कै. कृष्णाजी नारायण पोटे मयत** (मृत्यू दि. ०३.०२.१९९४) **यांचे वारस**<br>१) सुमती दत्तात्रेय पोटे २) आशा उर्फ अर्चना अशोक ठाकरे ३) सुवर्णा सुधाकर सोनटक्के ४) सुरेखा रविंद्र कामेरकर<br>प्रमिलाबाई कृष्णाजी पोटे (मयत)<br>मिना कृष्णाजी पोटे (मयत) (विना आपत्य)<br>१) सुनिल कृष्णाजी पोटे<br>२) राजेंद्र कृष्णाजी पोटे<br>३) अर्चना अशोक अंबवणे<br>४) सपना अनिल पोटे<br>५) हरिभाऊ नारायण पोटे<br>वारसदाखला CMA No ३७/२००८<br>**कै. अशोक गुरुनाथ पोटे मयत** (मृत्यू दि. १८.०३.२०११) यांचे वारस<br>१) अनिता अशोक पोटे २) विरेश अशोक पोटे ३) योगेश अशोक पोटे ४) संमती अशोक पोटे<br>वारसदाखला CMA No ३३८/२०१२ | **हक्कसोड पत्र लिहून घेणार:** १) सुमती दत्तात्रेय पोटे २) अर्चना उर्फ आशा अशोक ठाकरे ३) सुवर्णा सुधाकर सोनटक्के ४) सुरेखा रविंद्र कामेरकर<br>**हक्कसोड पत्र लिहून देणार:** गुरुनाथ नारायण पोटे मयत यांचे वारस १) श्रीमती. शांताबाई गुरुनाथ पोटे २) श्री. काशीनाथ गुरुनाथ पोटे ३) श्री. अशोक गुरुनाथ पोटे ४) श्रीमती. निता नरेंद्र साखरे कृष्णाजी नारायण पोटे मयत यांचे वारस ५) श्री. सुनिल कृष्णाजी पोटे ६) श्री. राजेंद्र कृष्णाजी पोटे ७) श्रीमती. मिना कृष्णाजी पोटे ८) सौ. अर्चना अशोक आंबवणे कै. अनिल कृष्णाजी पोटे मयत यांचे वारस ९) श्रीमती. स्वप्ना अनिल पोटे १०) कु. दिपाली अनिल पोटे ११) कु. दर्शन अनिल पोटे १२) श्री. हरिभाऊ नारायण पोटे<br>**हक्कसोड पत्र लिहून घेणार:** १) श्रीमती.अर्चना उर्फ आशा अशोक ठाकरे २) श्रीमती.सुवर्णा सुधाकर सोनटक्के ३) श्रीमती. सुरेखा रविंद्र कामेरकर<br>**हक्कसोड पत्र लिहून देणार:** १) श्रीमती. सुमती दत्तात्रेय पोटे<br>**१) श्रीमती.अर्चना उर्फ आशा अशोक ठाकरे,**<br>**२) श्रीमती.सुवर्णा सुधाकर सोनटक्के,**<br>**३) श्रीमती.सुरेखा रविंद्र कामेरकर**<br>यांचे नावे भूखंडाचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. |
| | | | | | | ०-४२-५ | | |
| ३ | खारघर ३०१ | खारघर २३० | १२३/३<br>१२३/६<br>१२१/२<br>१०२/४ | ०-५२-०<br><br><br>०-२०-८ | ६५० चौ.मी. पैकी १०० चौ.मी. | भूखंड क्र. ४६D, सेक्टर-३४A, क्षेत्र-१०० चौ.मी. | कै. नामदेव पांडुरंग ठाकूर (मयत) यांचे वारस<br>१) श्री. गोपीनाथ नामदेव ठाकूर<br>२) विश्वनाथ नामदेव ठाकूर<br>३) रामनाथ नामदेव ठाकूर<br>४) श्रीमती. जनाबाई बाळाराम म्हात्रे | निरंक |
| | | **एकूण क्षेत्र** | | ०-७२-८ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करावयाचे ठिकाण :** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड / ठाणे)
सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/५७५/२०२५-२६**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | ११७४ | बागायत ०-०२-८०<br>पो.ख. ०-०४-३०<br>एकुण ०-०७-१० | ०.४७ |

वर वर्णन केलेली संपुर्ण जमीन मिळकत तसेच त्यावर असणारी ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्र. ९१४ हि घर मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक राजश्री बळीराम भोईर, साधना रामचंद्र भोईर, निता जितेंद्र ठाकुर, सारिका शैलेश पाटील, साहिल शैलेश पाटील यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीबर अथवा तिथे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ३०/०३/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ७ व ८, ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर, ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. देवांग हरिदास ठक्कर, २) मंजू पन्नालाल तापडिया, ३) नवरतन पन्नालाल तापडिया व ४) रेखा निलेश राठी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलवली | ३२३ | ०-२४-८०<br>०-०९-१०<br>**०-३३-९०**<br>पो. ख. ०-०२-७०<br>**०-३६-६०** | ६.२१ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३१/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ८३/४/अ | एकूण क्षेत्र ५-१२-४० हे.आर या खाते क्र. ६०१ ज्याचे एकूण क्षेत्र १-१२-४० हे.आर.या पैकी १) सुवर्णा मोहन कडू २) अनंत गणपत घोडविंदे ३)एकनाथ गणपत घोडविंदे याचे हिश्याचे विक्री क्षेत्र ०-५६-२० हे.आर | ०.७५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ३१/०३/२०२६

सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विलास भास्कर नाईक रा. स्टेशन रोड, उल्हासनगर ४, ठाणे यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | चौल ता.अलिबाग | ७३६ | ०-२७-४०<br>पो.ख.०-०२-६०<br>एकूण ०-३०-०० | १०.५४ |
| या बागायत मिळकतीपैकी श्री. विलास भास्कर नाईक यांचे मालकीची ०-०४-५९ हे. आर. पो.ख. ०-००-५१ हे. आर. एकूण क्षेत्र ०-०५-१० हे. आर. आकार रु.१.७७ पैसे ही बागायत मिळकत | | | | |
| २ | चौल ता. अलिबाग | ७३७ | ०-०८-८०<br>पो.ख.०-०१-६०<br>एकूण ०-१०-४० | ३.९४ |
| या बागायत मिळकतीपैकी श्री. विलास भास्कर नाईक यांचे मालकीहक्कात असलेले ०-०१-९६ हे.आर. पो. ख. ०-००-५९ हे.आर. एकूण ०-०२-५५ हे. आर., आकार रु. ०.७० पैसे मिळकत | | | | |

सबब सदरहू बागायत मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठे करार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहितआहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/०३/२०२६

सही /-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रज्ञा उदय नवघरे व २) राहूल उदय नवघरे, रा. दहीसर, मुंबई यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**गाव सोगांव येथील गावठाणातील हद्दीतील मौजे मुनवली येथील खालीलप्रमाणे मोजमापांची व चतुः सिमांकीत गावठाण मिळकत :**
**गावठाण मिळकतीची लांबी-रुंदी :**
पुर्व-पश्चिम उत्तर बाजूस ४७ फूट, पुर्व-पश्चिम दक्षिण बाजूस ४३ फूट, दक्षिणोत्तर पुर्व बाजूस ४८ फूट व दक्षिणोत्तर पश्चिम बाजूस ४८ फूट अशी सुमारे २ आर क्षेत्राची गावठाण मिळकत.
गावठाण मिळकतीस चतुः सिमा :
पुर्वेस : भाऊ पांडूरंग पाटील यांची घर मिळकत.
पश्चिमेस : अरविंद महादेव मसुरकर यांची घर मिळकत.
दक्षिणेस : हरिश्चंद्र नथुराम घाडी यांची मिळकत.
उत्तरेस : नारायण महादेव कदम यांची घर मिळकत.
तसेच त्या गावठाण मिळकतीमध्ये असलेले ग्रुपग्रामपंचायत मापगांव मिळकत क्र. १२५ हे सुमारे २७ फूट X २७ फूट, अशा लांबी-रूंदीचे एकूण क्षेत्रफळ ७२९ चौरस फूट व आकारणी रूपये २०२०.०० असलेले दुमजली पक्के घर.
सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, भाडेकरार, विक्रीचा करार, लिव्ह ॲण्ड लायसेन्स करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३१/३/२०२६

सही /-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/ १, २, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे वरसोली ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-००-४० आर चौ.मी क्षेत्र व त्यातील घर मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक सुरुची सुनिल पाटील व अलका प्रकाश नाईक, रा.वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड, यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड | ५६/३ | १०-४०-०० | १०४-०० |

वर नमुद मिळकतींपैकी ०-००-४० आर.चौ.मी. क्षेत्र व त्यावरील ग्रामपंचायत वरसोली, घर मिळकत क्र.१८८२ अ क्षेत्र ३५६ चौ. फूट व घर मिळकत क्र. १८८२ ब, क्षेत्र ३५६ चौ. फूट या मिळकती.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे पुराव्यासहीत लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ३०.०३.२०२६

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस
### मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात

ज.नों. प्रस्ताव क्र.१८/२०२६

१. नागेश शांताराम शेपुंडे,
रा. विघवली, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
वारक, ग्रामपंचायत वारक,
ता. माणगाव, जि. रायगड — सामनेवाले
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वारक, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव जा.क्र. १५५/२०२५, दि. २२/१२/२०२५ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी श्री. नागेश शांताराम शेपुंडे, रा. विघवली, ता. माणगाव, जि. रायगड यांचा यांचा जन्म दि. ०१/०६/१९७५ रोजी मौजे विघवली, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

श्री. नागेश शांताराम शेपुंडे, रा. विघवली, ता. माणगाव, जि. रायगड यांचा यांचा जन्म दि. ०१/०६/१९७५ रोजी मौजे विघवली, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला आहे. तरी श्री. नागेश शांताराम शेपुंडे, रा. विघवली, ता. माणगाव, जि. रायगड यांचा यांचा जन्म दि. ०१/०६/१९७५ रोजी मौजे विघवली, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे जन्माबाबतची नोंद निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वारक, ता. माणगाव यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वारक, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे. तसेच नागेश शांताराम शेपुंडे यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत वारक यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी. विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास नागेश शांताराम शेपुंडे, रा. विघवली, ता. माणगाव, जि. रायगड यांचा यांचा जन्म दि. ०१/०६/१९७५ रोजी मौजे विघवली, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाणः माणगाव
दिनांक : १२/०१/२०२६

सही/-
**(विधान लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

# मुंबईची पहिल्यांदाच विजयी सुरूवात

## पलटणचा केकेआरवर ऐतिहासिक विजय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएल २०२६ मधील दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्सने वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सचा ६ गडी राखून धुव्वा उडवत हंगामाची विजयी सुरुवात केली. तब्बल १३ वर्षांनंतर मुंबईने स्पर्धेतील पहिलाच सामना जिंकत चाहत्यांना मोठी भेट दिली. कोलकाताने दिलेल्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना रायन रिकल्टन आणि रोहित शर्माने हिट शो दाखवत सगळं चित्रच बदलून टाकले. कोलकाताने २० षटकांत २२१ धावांचे एक विशाल लक्ष्य उभारले होते. मात्र, मुंबई इंडियन्सने हे लक्ष्य केवळ १९.१ षटकांत सहजपणे गाठले आणि एका ऐतिहासिक विजयाची नोंद केली.

मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. सुरुवातीलाच अजिंक्य रहाणे आणि फिन ॲलन यांनी कोलकाताला जबरदस्त सुरुवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या बळीसाठी ६९ धावांची भागीदारी केली. मात्र, ही जोडी शार्दुल ठाकूरने फोडत मुंबईला पहिले यश मिळवून दिले. फिन ॲलनने ३७ धावांची तुफानी खेळी केली. त्यानंतर आलेल्या कॅमेरून ग्रीननेही थोडा प्रतिकार केला, परंतु शार्दुल ठाकूरने त्यालाही १८ धावांवर बाद करत कोलकाताला दुसरा धक्का दिला. त्यानंतर कर्णधार अजिंक्य रहाणेने डाव सांभाळत आक्रमक फलंदाजी केली. त्याने ४० चेंडूत ६७ धावांची शानदार खेळी साकारली. रहाणेचा फॉर्म पाहता तो मोठी खेळी करणार असे वाटत असतानाच पुन्हा एकदा शार्दुल ठाकूरने त्याला बाद करत मुंबईला महत्त्वाचे यश मिळवून दिले. दुसऱ्या बाजूला अंगकृष रघुवंशीनेही तितक्याच आक्रमक शैलीत फलंदाजी करत ५१ धावा ठोकल्या. अखेरीस रिंकू सिंगने ३३ धावा करत संघाची धावसंख्या २२० पर्यंत पोहोचवली. मुंबईकडून शार्दुल ठाकूरने सर्वाधिक ३ बळी घेत कोलकाताच्या फलंदाजांना आवर घालण्याचा प्रयत्न केला; तर, कर्णधार हार्दिक पांड्याला १ बळी मिळाला.

### अनेक विक्रमांची नोंद

या सामन्यात मुंबई इंडियन्सने केवळ विजयच मिळवला नाही, तर अनेक विक्रमही प्रस्थापित केले आहेत. कोलकाता विरुद्धचा हा मुंबईचा २५वा विजय ठरला असून आयपीएलच्या इतिहासात एकाच प्रतिस्पर्ध्याविरुद्ध २५ सामने जिंकणारा पहिला संघ बनण्याचा मान मिळवला आहे. शिवाय, वानखेडे स्टेडियमवर आपले वर्चस्व कायम राखण्यातही त्यांना यश आले आहे. त्याचबरोबर २२१ धावांचा यशस्वी पाठलाग हा मुंबईचा आयपीएल इतिहासातील धावांचा सर्वात मोठा पाठलाग ठरला आहे.

### १३ वर्षांचा वनवास संपवला

कोलकाताने दिलेल्या २२१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईचे सलामिवीर रोहित शर्मा व रायन रिकल्टन यांनी आक्रमक सुरूवात केली. या जोडीने कोलकाताच्या अनुभव कमी असलेल्या गोलंदाजांना झोडले. या दोघांनी ११.५ षटकांत फलकावर १४८





### वानखेडेवर रो'हिट' शो

वानखेडे मैदानावर रोहित शर्माचा हिट शो पाहायला मिळाली. आपल्या घरच्या मैदानावर खेळताना रोहितने कोलकाता संघाच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. रोहितने ७८ धावांची दमदार खेळी केली. या खेळीदरम्यान रोहितने ६ चौकार आणि ६ गगनचुंबी षटकार खेचले. त्याचबरोबर रोहित शर्मा हा आयपीएलमध्ये एकाच संघाविरुद्ध सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे. या विक्रमात त्याने विराट कोहलीला मागे टाकले आहे. रोहितने कोलकाता नाईट रायडर्स संघाविरुद्ध खेळताना एकूण १,१६१ धावा केल्या आहेत. विराटच्या नावे कोलकाता संघाविरुद्ध खेळताना १,१५९ धावा करण्याची नोंद आहे. त्यामुळे विराट कोहली या यादीत दुसऱ्या स्थानी घसरला आहे.

## निवडक

### आफ्रिदी, रझा यांच्यावर गंभीर आरोप

**नवी दिल्ली :** पाकिस्तान सुपर लीग २०२६ मधील लाहोर कलंदर्स संघाला थेट लक्ष्य केले जात आहे. संघाचा कर्णधार शाहीन शाह आफ्रिदी आणि अष्टपैलू खेळाडू सिकंदर रझा यांच्यावर गंभीर गैरवर्तनाचा आरोप आहे. पंजाब पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या दोन खेळाडूंनी प्रस्थापित सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करून, चार अनधिकृत व्यक्तींना खेळाडूंच्या हॉटेलच्या मजल्यावर प्रवेश दिला. त्यानंतर त्यांना कथितरित्या त्यांच्या खोल्यांमध्ये बळजबरीने नेले. अहवालानुसार, हॉटेलमध्ये थांबलेल्या खेळाडू आणि सपोर्ट स्टाफच्या सुरक्षेत फेरफार झाल्यावर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. सलमान नसीर यांना पोलिसांनी पाठवलेल्या पत्रात स्पष्टपणे म्हटले होते की, या पाहुण्यांना परवानगी नव्हती आणि संघाच्या संपर्क अधिकाऱ्याची विनंतीही दोनदा नाकारण्यात आली होती. असे असूनही, कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांचा विरोध असूनही शाहीन आणि रझा यांनी पाहुण्यांना आत नेले आणि ते तिथे सुमारे तीन तास थांबले होते.





### पीएसएल वादाच्या भोवऱ्यात

**नवी दिल्ली :** पाकिस्तान सुपर लीग पुन्हा वादाच्या भोवऱ्यात अडकली असून लाहोर कलंदर्सचा खेळाडू फकर जमानवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पाकिस्तान सुपर लिग २६ मार्चपासून लाहोर येथे सुरू आहे, पहिला सामना लाहौर कलंदर्स आणि हैदराबाद किंग्समैन यांच्यात झाला. सुरुवातीलाच चेंडूचा रंग उडाला असून पांढरा चेंडू लाल झाला, तर जर्सीच्या दर्जावरही प्रश्न निर्माण झाले. आणि आता तर बॉल टॅम्परिंचा आरोप पाकिस्तानी स्टार खेळाडू वर लागला आहे. रविवारी पाकिस्तान सुपरलिगमध्ये लाहोर कलंदर्स आणि कराची किंग्स यांच्यात सामना सुरू असताना बॉल टॅम्परिंगचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पाकिस्तानी फलंदाज फखर जमानवर बॉल टॅम्परिंगचा आरोप करण्यात आला आहे. लाईव्ह सुरूअसलेल्या सामन्यात फकर जमान चेंडूशी छेडछाड करत असल्याचा आरोप होत आहे हा सगळा प्रकार कॅमेऱ्यामध्ये कैद झाला असून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



### स्टार क्रिकेट ग्रुप विजयी

**महाड :** क्रिकेट कट्टा तर्फे महिलांच्या टेनिस बॉल अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि.२९) महाड शहरातील भिलारे मैदानात करण्यात आले होते. या स्पर्धेत स्टार क्रिकेट ग्रुप विजयी ठरला. तर, पंचायत समिती ग्रुपला उपविजेते पदावर समाधान लाभले. या अंडरआर्म टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत एकुण नऊ महिला संघानी आपला सहभाग नोंदविला होता. उन्हाच्या तडाक्यात चौकार षटकारांच्या आतषबाजीनी क्रिकेट रसिकांचे दिवसभर मनोरंज झाले. या स्पर्धेत अंतिम सामना स्टार क्रिकेट क्लब व पंचायत समिती ग्रुप यांच्यात झाला. यावेळी स्टार क्रिकेट क्लबने बाजी मारत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाला रोख रकक्म ५ हजार रुपये व आकर्षक चषक, द्वितिय क्रमांकाला रोख रक्कम ३ हजार रुपये व आकर्षक चषक तर, तृतीय क्रमांकाला रोख रक्कम २ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच, या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट फलंदाज करूना कदम, गोलंदाज रुपाली पारधी व मालिकावीर स्वरा वाढवळ यांना नगराध्यक्ष सुनील कविस्कर, उपनगराध्यक्ष संदिप जाधव, नगरसेविका पूनम कोरपे, नगरसेविका अक्षया हेलेकर, नगरसेविका पालवी गोळे, संकेत वारंगे, भूषण कदम व राजेश देशमुख यांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धेदरम्यान नगरसेवक ॲड सनी जाधव, नगरसेविका मिनल जाधव, नगरसेविका गीतांजली महाडीक, पत्रकार रवि शिंदे व महेश शिंदे आदी मान्यवरांनी भेट दिली.

## अमृताने पटाकवला 'केसरी'चा मान

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

सोलापुरात झालेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेच्या चित्तथरारक अंतिम लढतीत कोल्हापूरच्या अमृता पुजारीने वेदिका सासनेला अस्मान दाखवत महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळवला. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आयोजित सोलापुरातील हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर रविवारी (दि.२९) सायंकाळी महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेची अंतिम लढत अमृता पुजारी विरुद्ध वेदिका सासणे यांच्यात झाली. सुरुवातीपासून अमृता हिने आक्रमक चाल खेळत पहिल्या दीड मिनिटांत दोन गुण मिळवत आघाडी घेतली. त्यानंतर पुन्हा तीन गुण मिळवून पहिल्या सत्रात पाच शून्य अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रात वेदिकाने आक्रमक चाल खेळली; परंतु, अमृताने संयम दाखवत पुन्हा दोन गुण घेतले आणि विजय पक्का केला. शेवटचे दोन मिनिटे अमृताने डिफेन्स करत वेदिकाला थोपवून ठेवले. ७-० अशा फरकाने अमृताने वेदिकाचा पराभव करत महाराष्ट्र केसरीचा मान मिळवला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विजेत्या अमृता पुजारी हिला चांदीची गदा, रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व सोनेट कारची चावी प्रदान करण्यात आली. तर, उपविजेत्या वेदिका सासनेला २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि बुलेट बक्षीस देण्यात आली.

## कालभैरव भार्जे ठरला अंतिम विजेता

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुका स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने प्रथमच स्वयंभू हनुमान रहिवासी मंडळाच्यावतीने तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा रविवारी (दि.२९) पुणे-स्वारगेट येथील नेहरू स्टेडियम येथे पार पडल्या. या स्पर्धे साठी विविध क्षेत्रातील मान्यवर, खेळाडू, क्रीडाप्रेमी व सुधागड वासीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. आयोजकांनी युट्यूबच्या माध्यमातून या स्पर्धेच्या थेट प्रक्षेपणाची सोय क्रीडाप्रेमींसाठी करण्यात आली होती. या स्पर्धेचा अंतिम विजयी कालभैरव भार्जे हा संघ ठरला असून रोख रक्कम ३१ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच,



द्वितीय क्रमांक आई सोमजाई माता गोमाशी या संघाने पटकावला असून त्यांना रोख रक्कम २१ हजार रुपये व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक उल्हास क्रीडामंडळ अंबोले व चतुर्थ क्रमांक ओम कालभैरव अपटवणे या दोन्ही संघांना रोख रक्कम ११ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू शुभम शिंदे, उत्कृष्ट चढाई सूरज मगर, उत्कृष्ट पक्कड ऋतिक सावंत, पब्लिक हिरो रोशन बयकर व उत्कृष्ट प्रेक्षक सुशील राठोड यांना देखील आकर्षक बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

## निवड चाचणीसाठी ठाण्याचे संघ जाहीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नाशिक येथे दि.२ एप्रिलपासून होणाऱ्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता ठाणे जिल्ह्याने आपले पुरुष व महिला संघ जाहीर केले आहेत. त्यात असलम इनामदार याच्याकडे पुरुष, तर पूजा झेपले-जाधव हिच्याकडे महिला संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. हे दोन्ही संघ ठाणे (प.) येथील दादोजी कोंडदेव क्रीडा संकुलात सराव करता आहे. पुरुष संघात असलम इनामदार (संघनायक), अतुल देसले, मंगेश सोनवणे, अजय पाटील, तुषार भोईर, सुरज



दुंदले, वैभव पाटील, विघ्नेश चौधरी, रोहन तुपारी, शुभम शिर्के, परेश म्हात्रे, अरिहंत पाटील, हर्ष भोईर व सुजल म्हात्रे यांचा समावेश आहे. तर, महिला संघात पूजा झेपले-जाधव (संघनायिका), देवयानी पाटील, निधी राजोळे, तेजस्वी जाधव-पाटेकर, ऐश्वर्या राऊत, वैष्णवी साळुंखे, पूर्वा इंगवले, रेखा पाटील-चिकणे, प्राजक्ता पुजारी, माधुरी गवंडी, समृद्धी मायंगडे, तारा देसाई, वैष्णवी चव्हाण, व ऐश्वर्या पाटील यांचा समावेश आहे.

## दिग्गजांशिवाय मैदानात उतरणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सच्या इतिहासात पहिल्यांदाच एक मोठी गोष्ट घडणार आहे. या हंगामात संघ एम.एस. धोनी, रवींद्र जडेजा आणि सुरेश रैना या तिघांशिवाय मैदानात उतरणार आहे. चेन्नईची फ्रँचायझी सध्या बदलाच्या टप्प्यातून जात आहे. एकेकाळी अनुभवी खेळाडूंना संधी देण्यासाठी ओळखली जाणारी ही टीम, आता भविष्याचा विचार करून तरुण खेळाडूंवर विश्वास दाखवत आहे.

## तिकीट विक्री करणाऱ्यांवर कारवाई

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई क्रिकेट असो.कडून मोफत किंवा अनुदानित दरातील तिकिटे चढ्या दराने विकणाऱ्या आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यात आदित्य रावराणे आणि त्याच्या सहा साथीदारांना या महिन्यात अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आता २५ मार्च रोजी सोढालाही अटक करण्यात आली. सोढाने प्रत्येकी २५ हजार रुपयांना दोन तिकिटे विकली. परंतु, ही तिकिटे त्याने कुठून मिळवली, याची माहिती समोर येऊ शकलेली नाही. पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही सोढाचा कॉल रेकॉर्ड तपासत असून आणखी माहिती हाती लागण्याची शक्यता आहे. आदित्य रावराणे नामक व्यक्ती चढ्या दराने तिकिटे विकत असल्याची गुप्त माहिती पोलिसांच्या हाती लागली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तोतया ग्राहक बनून रावराणेशी संपर्क साधला. विलेपार्ले येथे भेटल्यानंतर रावराणेने २५ हजार रुपयांची २ तिकिटे विकण्यास होकार दर्शवला. रावराणेची चौकशी केली असता त्याने सिद्धार्थ सभापतीचे नाव घेतले. त्यानंतर सभापतीने मेघन प्रधान करवी दोन अतिरिक्त तिकिटे पाठवून दिली. त्यानंतर प्रधानलाही अटक करण्यात आली.

## भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**पेण :** पाटणेश्वर येथे शिवशंभो क्रीडा मंडळातर्फे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्हा कबड्डी असो.च्या मान्यतेने ही स्पर्धा दि.१८ एप्रिल रोजी सुरू होणार आहे. या स्पर्धेत विविध भागांतील कबड्डी संघांचा सहभाग अपेक्षित असून खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची मोठी संधी मिळणार आहे. या स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून, प्रथम क्रमांकासाठी ३३,३३३ रूपये व चषक, द्वितीय क्रमांकासाठी २२,२२२ रूपये व चषक, तृतीय क्रमांक व चतुर्थ क्रमांकासाठी ११,१११ रूपये व चषक देण्यात येणार आहे. याशिवाय उत्कृष्ट खेळाडू रोख रक्कम ५,५५५, उत्कृष्ट चढाई रोख रक्कम ३,३३३, उत्कृष्ट पकड रोख रक्कम ३,३३३ आणि पब्लिक हिरो रोख रक्कम ३,३३३ असे देखील विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी प्रवेश फी ही १ हजार रुपये असणार आहे.

## अलिबागच्या वकिलांची दमदार कामगिरी

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

माणगाव-गोरेगाव येथील मुमताज गार्डन क्रिकेट मैदानावर पत्रकार भारत गोरेगावकर यांच्या पुढाकाराने व ओम फाऊंडेशनच्यावतीने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अलिबाग बार असो. वकिलांच्या संघाने दमदार कामगिरी केली. त्यांनी रायगड पोलीस संघावर २० धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

या स्पर्धेत रायगड पोलीस व अलिबाग बार असो. वकिल यांच्यात रविवारी (दि.२९) अंतिम सामना खेळवला गेला. यावेळी पोलिसांनी नाणेफेकीचा कौल



जिंकत वकिलांच्या संघाला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केले. ५ षटकांच्या या सामन्यात वकिलांच्या संघाने ४ गडी गमावत ७३ धावा काढल्या. त्यामध्ये ॲड. मनीष पाटील (५४) यांनी संघाला मजबूत स्थितीत आणले. प्रतिउत्तर देताना पोलिसांच्या संघाने ५ षटकांच्या समाप्तीनंतर ३ गडी बाद ५३ धावा केल्या. यावेळी वकिलांच्या संघाकडून ॲड. प्रशांत गावंड, ॲड. मनीष पाटील, ॲड. हर्षल पाटील, ॲड. विश्वेष पिकले, ॲड. समीर बंगाली यांनी चांगली गोलंदाजी करत संघाला विजय मिळवून दिला. तसेच, सामनावीर म्हणून ॲड. मनीष पाटील यांना गौरविण्यात आले.

### राष्ट्रीय आदर्श क्रिडारत्न पुरस्काराने सन्मानित | अलिबागसह रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा

## तनिष्का पाटीलची क्रीडा क्षेत्रात भरारी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

कराटे या क्रिडा क्षेत्रात अलिबागमधील तनिष्का पाटील या तरुणीने भरारी घेतली आहे. तिच्या उत्तम कामगिरीची दखल घेत राष्ट्रीय आदर्श क्रिडारत्न पुरस्काराने तिला सन्मानित करण्यात आले. छावा प्रतिष्ठान, छावा शिवकालीन बहूउद्देशीय कलामंच आयोजित छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय पुरस्कार कार्यक्रमात नवी मुंबईतील वाशी येथील मराठी साहित्य मंदिर हॉलमध्ये शनिवारी (दि.२८) हा गौरव करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष वस्ताद डॉ. अमित गडांकूश, नरवीर तानाजी मालुसरे यांचे वंशज सुभेदार



कुणाल मालुसरे, नवी मुंबईचे अपर पोलीस आयुक्त दिपक साकोरे, उपआयुक्त डॉ. राज खतीब, पोलीस उपअधीक्षक तथा महाराष्ट्र केसरी विजेते विजय चौधरी, मराठी अभिनेते विजय पाटकर आदी मान्यवरांसह महाराणी येसुबाई यांचे वंशज दिपक शिर्के, उद्योजक रोहित पिसाळ, वैभव नाईक, नगरसेविका वैष्णवी नाईक व प्रसिद्ध गायक संकल्प गोळे आदी उपस्थित होते.

तनिष्का पाटील ही खेळाडू अलिबाग तालुक्यातील वाघोडे येथील रहिवासी आहे. सध्या ती पेझारी येथील नाना पाटील हायस्कूलमधील इयत्ता सहावी या वर्गात शिक्षण घेत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ती प्रशिक्षक संतोष कवळे यांच्याकडे कराटेचे प्रशिक्षण घेत असून पेझारी कराटे क्लास या ॲकेडमीमध्ये शिक्षण घेत आहे. तनिष्काने आतापर्यंत ४०हून अधिक पदके मिळविली आहेत. खोपोली येथे झालेल्या राज्यस्तरिय खुल्या कराटे स्पर्धेत कांस्यपदक व अलिबाग तालुकास्तरिय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून तिची नाशिक येथे होणाऱ्या जिल्हा स्तरिय स्पर्धे साठी निवड झाली.

अलिबागमध्ये झालेल्या ऑल महाराष्ट्र थांग- ता असोसिएशन राज्यस्तरिय स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक मिळविले. त्यानंतर राज्यस्तरिय स्पर्धेसाठी निवड झाली. अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरिय स्पर्धेत कांस्यपदक, मुरूड येथे झालेल्या हिवाळी प्रशिक्षण शिबिरात मास रेसलिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत मांस रेसलिंग क्रीडा प्रकारात कांस्य व बेल्ट रेसलिंग क्रिडा प्रकारात रौप्यपदक मिळवून यश संपादन केले. तिच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत तनिष्काला राष्ट्रीय आदर्श क्रिडा रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)